मराठी

# बालभारती

## इयत्ता सातवी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# बालभारती

## इयत्ता सातवी



**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

शेजारचा 'क्यू आर कोड' स्मार्टफोनचा वापर करून स्कॅन करता येतो. स्कॅन केल्यावर आपल्याला या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त लिंक/लिंक्स (URL) मिळतील.

प्रथमावृत्ती : २०१७

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**मराठी भाषातज्ज्ञ समिती**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
श्रीमती माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
डॉ. माधव बसवंते
श्री. देविदास तारू
श्री. संदीप रोकडे
श्रीमती स्मिता गालफाडे
डॉ. प्रमोद गारोडे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. शिवा कांबळे
डॉ. सुभाष राठोड
श्री. मोहन शिरसाट
श्री. नाना लहाने
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. प्रवीण खैरे
श्रीमती प्रतिभा लोखंडे
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती जयमाला मुळीक
श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. कमलादेवी आवटे
श्री. हेमंत गव्हाणे

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**निमंत्रित तज्ज्ञ**

श्री. शिवाजी तांबे
श्रीमती सुजाता महाजन

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : फारुख नदाफ

**मुखपृष्ठ** : आभा भागवत

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
सचिन मेहता, निर्मिती अधिकारी
नितीन वाणी, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N

**मुद्रक** : M/s.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता सातवीच्या वर्गात स्वागत आहे. 'बालभारती' हे मराठी भाषेचे तुमच्या आवडीचे पुस्तक! इयत्ता सातवीचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातात देताना अतिशय आनंद होत आहे.

मित्रांनो, मराठी ही आपली एकमेकांबरोबर संवाद साधण्याची मुख्य भाषा आहे. ती आपल्या राज्याची राजभाषा आहे. आपले विचार, भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील तर भाषेवर प्रभुत्व हवे. या पुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व वाढावे, भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमावे असे आम्हांला वाटते.

या पाठ्यपुस्तकातून वेगवेगळ्या साहित्यप्रकारांचा परिचय तुम्हांला करून दिला आहे. भाषेचा व्यवहारात कसा उपयोग होतो, याचेही नमुने दिले आहेत. महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांची तुम्हांला ओळख व्हावी म्हणून बोलीभाषेतील उतारेही दिले आहेत. ते वाचून तुम्हांला मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे, हे लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा, म्हणून या पुस्तकात अनेक कृती दिल्या आहेत.

पाठ्यपुस्तकात 'वाचा', 'चर्चा करूया', 'विचार करा, सांगा', 'खेळ खेळूया', 'खेळूया शब्दांशी', 'माहिती मिळवूया', 'लिहिते होऊया', 'शोध घेऊया', 'कल्पक होऊया', 'माझे वाचन' यांसारख्या अनेक कृती दिल्या आहेत. त्या कृती तुम्ही जरूर करा. भाषाभ्यासाच्या कृतींतून भाषेचे घटक, त्यांचे उपयोग समजावून घ्या. संगणक, मोबाइल या माध्यमांचा वापर करूनही तुम्हांला काही कृती करायच्या आहेत. या कृती करताना तुम्हांला नक्कीच मजा येईल.

तुमच्या कल्पकतेला आणि विचारांना चालना देणाऱ्या या पाठ्यपुस्तकाबाबतचे तुमचे मत आम्हांला जरूर कळवा.

तुम्हां सर्वांना शुभेच्छा !

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ मार्च, २०१७, गुढीपाडवा
भारतीय सौर : ७ चैत्र १९३९

# भाषाविषयक क्षमता : प्रथम भाषा मराठी

**इयत्ता सातवीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्या, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्या, चर्चा व संवाद समजपूर्वक ऐकता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणांवरील सूचना समजपूर्वक ऐकता येणे.<br>३. घर व परिसरातील अनौपचारिक विषयांवरील संवाद ऐकता येणे.<br>४. विनोद, गाणी, कविता, कथा व संवाद ऐकून आनंद घेता येणे.<br>५. गीते, समूहगीते, कविता, वक्त्यांची भाषणे व विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे.<br>६. विविध बोलीभाषा लक्षपूर्वक व समजपूर्वक ऐकता येणे. |
| भाषण-संभाषण | १. गाणी, कविता, समूहगीते योग्य अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहांसह म्हणता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांचे साभिनय सादरीकरण करता येणे.<br>३. सर्व वयोगटांतील व्यक्तींसमवेत प्रसंगानुरूप संवाद, गटचर्चा यात सहभाग घेता येणे.<br>४. घर, शाळा, समाज व परिसर यांमध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांत सहभाग घेता येणे.<br>५. योग्य व सुस्पष्ट शब्दांचा वापर करून संवाद साधता येणे.<br>६. आपले विचार सुस्पष्ट व मुद्देसूदपणे मांडता येणे. |
| वाचन | १. गाणी, कविता, समूहगीते, पाठ यांचे योग्य आरोह-अवरोहासह वाचन करता येणे.<br>२. दिलेल्या वेळेत योग्य गतीने समजपूर्वक मूकवाचन करता येणे.<br>३. योग्य आरोह-अवरोह व विरामचिन्हे यांची दखल घेऊन, अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>४. दिलेल्या उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करून योग्य शीर्षक देता येणे.<br>५. विविध साहित्य प्रकारांचे साभिनय वाचन करता येणे.<br>६. पाठ्यपुस्तकाबरोबरच इतर अवांतर वाचनसाहित्याचा आनंद घेता येणे. |
| लेखन | १. लेखन नियमांनुसार वेळेत, योग्य गतीने अनुलेखन व श्रुतलेखन करता येणे.<br>२. ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्याच्या आशयावरील प्रमुख मुद्दे स्वत:च्या शब्दांत लिहिता येणे.<br>३. दिलेल्या विषयावर मुद्देसूद लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्द व शब्दसमूह यांचा लेखनात योग्य ठिकाणी वापर करता येणे.<br>५. शाळेच्या हस्तलिखितासाठी विविध प्रकारचे लेखन करता येणे.<br>६. चित्र, प्रसंग यांचे वर्णनात्मक लेखन करता येणे.<br>७. विविध क्षेत्रातील व्यक्तींची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करता येणे. |

**अध्ययन कौशल्य**

१. संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.
२. मजकुरावरून आकृती तयार करता येणे व आकृतीतील मुद्द्यांच्या आधारे मजकूर तयार करता येणे.
३. वाक्प्रचार व म्हणींचा जीवनव्यवहारात उपयोग करता येणे. एकाच अर्थाचे अनेक वाक्प्रचार सांगता येणे.
४. म्हणी, वाक्प्रचार व सुभाषिते यांचा संग्रह करता येणे.
५. स्वत:ला हवी असणारी माहिती आंतरजालावर शोधता येणे.
६. आपल्याला हवी असणारी चित्रे, व्हिडिओ क्लिप्स, फिल्म्स इत्यादी शोधता येणे.
७. विविध स्वरूपांतील डिजिटल साहित्य हाताळता येणे. (ई-बुक्स, ऑडिओ बुक्स, इंटरॲक्टिव्ह साहित्य, भाषिक खेळ इत्यादी)
८. संकेतस्थळांची रचना समजून घेऊन त्यातील विविध बाबींचा यथायोग्य वापर करता येणे.
९. संगणकीय शिष्टाचार समजणे. उदा., इतरांचा पासवर्ड पाहू नये.
१०. विविध साहित्यप्रकारांची स्थूलमानाने ओळख होणे.
११. अवांतर वाचनसाहित्याच्या वाचनाची आवड निर्माण होणे.
१२. परिसरातील सामाजिक समस्यांची जाणीव होणे.

**भाषाभ्यास**

१. परिसरातील बोलल्या जाणाऱ्या बोलींकडून प्रमाणभाषेकडे जाता येणे.
२. इतर भाषांतून आलेले शब्द जीवनव्यवहारात वापरता येणे.
३. शब्दकोडी सोडवता येणे.
४. वाक्यातील सामान्यरूप ओळखता येणे.
५. क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये व केवलप्रयोगी अव्यये ओळखता येणे व त्यांचा वापर करता येणे.
६. वाक्य व वाक्यांचे प्रकार ओळखता येणे.
७. शुद्धलेखनाच्या नियमांचा लेखनामध्ये उपयोग करता येणे.

## संकेतस्थळे

http://youtu.be/cP46RcOa7zo
http://youtu.be/lejNM8QGuP4
http://youtu.be/mv_UMoxTvfQ
http://youtu.be/m5iT7CO7s5M
http://youtu.be/efc6MdWcuH4
http://youtu.be/Vfe_maSn2aU
http://youtu.be/XwY2k3ocNZI
http://youtu.be/2p1bxOFM0tY
http://youtu.be/1b8O1goYM6o
http://youtu.be/6FTBrtifKYQ
http://youtu.be/Bot98Qrh2ls
http://youtu.be/pG51VfA2lWI
https://en.m.wikipedia.org/wiki/Pandurang_Sadashiv_Khankhoje
http://www.aathavanitli-gani.com/Song/Anaam_Veera_Jithe_Jahala
https://en.m.wikipedia.org/wiki/Sudha_Murthy

**शिक्षकांनी अध्यापनात वर दिलेल्या संकेतस्थळांचा व लिंक्सचा संदर्भ म्हणून वापर करावा.**

# अनुक्रमणिका


## भाग – १

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
| --- | --- | --- |
| १. | जय जय महाराष्ट्र माझा (गीत) – राजा बढे | १ |
| २. | स्वप्नं विकणारा माणूस – अशोक कोतवाल | २ |
| ३. | तोडणी – दत्तात्रय विरकर | ९ |
| ४. | श्रावणमास (कविता) – बालकवी | १५ |
| ५. | भांड्यांच्या दुनियेत | १९ |

## भाग – २

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
| --- | --- | --- |
| ६. | थोरांची ओळख–डॉ. खानखोजे | २६ |
| ७. | माझी मराठी (कविता) – मृणालिनी कानिटकर-जोशी | ३० |
| ८. | गचकअंधारी – अशोक मानकर | ३३ |
| ९. | नात्याबाहेरचं नातं – सुभाष किन्होळकर | ३९ |
| १०. | गोमू माहेरला जाते (गीत) – ग. दि. माडगूळकर | ४५ |

## भाग – ३

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
| --- | --- | --- |
| ११. | बाली बेट – पु. ल. देशपांडे | ४९ |
| १२. | सलाम-नमस्ते ! – सुधा मूर्ती | ५५ |
| १३. | अनाम वीरा... (कविता) – कुसुमाग्रज | ६० |
| १४. | कवितेची ओळख – शारदा दराडे | ६४ |
| १५. | असे जगावे (कविता) – गुरू ठाकूर | ७० |

## भाग – ४

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
| --- | --- | --- |
| १६. | कोळीण – मारुती चितमपल्ली | ७४ |
| १७. | थेंब आज हा पाण्याचा (कविता) – सुनंदा भावसार | ८० |
| १८. | वदनी कवळ घेता... | ८५ |
| १९. | धोंडा – डॉ. संजय ढोले | ९० |
| २०. | विचारधन | ९९ |
| २१. | संतवाणी – संत नरहरी सोनार, संत कान्होपात्रा | १०० |


मुखपृष्ठावर ब्लू मॉरमॉन हे महाराष्ट्राचं राज्य फुलपाखरू पुस्तकरूपी फुलांतून मकरंदाचा आस्वाद घेताना दाखवलं आहे. शीर्षकपृष्ठावर हेच फुलपाखरू चिखलावर बसलेलं दाखवलं आहे. फुलपाखरं चिखलातूनही क्षार घेतात!

# १. जय जय महाराष्ट्र माझा

भाग–१

• ऐका. वाचा. म्हणा.



जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ.।।

रेवा वरदा, कृष्ण कोयना, भद्रा गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी
भीमथडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा ।।१।।

भीति न आम्हां तुझी मुळीही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला, जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो, शिव शंभू राजा
दरीदरींतुन नाद गुंजला, महाराष्ट्र माझा ।।२।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देशगौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तक्त राखितो महाराष्ट्र माझा ।।३।।

**राजा बढे** (१९१२–१९७७) : प्रसिद्ध कवी, लेखक, गीतकार, नाटककार, कादंबरीकार, कथाकथनकार. 'माझिया माहेरा जा', 'हसले मनी चांदणे', 'क्रांतिमाला', 'मखमल' इत्यादी गीतसंग्रह प्रसिद्ध; 'गीतगोविंद', 'गाथासप्तशती', 'मेघदूत' इत्यादी काव्यांचे अनुवादही प्रसिद्ध.

प्रस्तुत गीतातून कवीने महाराष्ट्राची थोरवी सांगितली आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून समूहगीत तालासुरांत म्हणून घ्यावे. इतर समूहगीतांच्या ध्वनिफिती ऐकवाव्यात.

# २. स्वप्नं विकणारा माणूस

**अशोक कोतवाल** (१९६१) : 'मौनातील पडझड', 'कुणीच कसे बोलत नाही' हे कवितासंग्रह; 'प्रार्थनेची घंटा', 'सावलीचं घड्याळ' हे ललितलेखसंग्रह; 'घेऊया गिरकी' हा बालकवितासंग्रह प्रसिद्ध.

प्रत्येक मनुष्य आपली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी सतत धडपडत असतो. स्वहिताबरोबरच समाजाच्या उपयोगी पडणारी व उदात्त हेतू असणारी स्वप्ने पाहावीत, असा संदेश पाठातून दिला आहे. प्रस्तुत पाठ 'सावलीचं घड्याळ' या ललितलेखसंग्रहातून घेतला आहे.

माणसाला स्वप्नं बघता आली पाहिजेत. नुसतीच बघता आली पाहिजेत, असं नाही, तर ती पूर्ण कशी होतील याचा विचार करता आला पाहिजे. असं आपणच नाही, तर आपल्यापेक्षा श्रेष्ठ असे सगळेच लोक म्हणत असतात. आता स्वप्नं ही निर्माण करावी लागतात, की ती उत्पन्न होतात हे आपल्याला माहीत नाही. स्वप्नांविषयी लोक काय काय बोलतात ! कुणी कुणी तर स्वप्नांना भलतंच तुच्छ लेखतात. 'भलती-सलती स्वप्नं पाहू नकोस', असा सल्लाही देतात.

माझं तर म्हणणं असं आहे, ज्याला स्वप्न बघता येत नाही तो माणूसच नाही ! जे स्वप्न आपल्याला समृद्ध करतं, ते बघण्यासाठी संवेदनशील मन असावं लागतं. ज्यांच्याकडे असं तीव्र संवेदनशील मन असतं, ती माणसं आपल्या स्वप्नपूर्तीसाठी वाट्टेल ते करतात. इतरांपासून आपल्याला वेगळं करतात. स्वत: काहीतरी आदर्श बनून ते वावरतात, नाहीतर इतरांना आदर्श बनवतात; पण अशा संवेदनशीलतेचा अभाव असणारी माणसं अधांतरीच तरंगत राहतात. ना धड इकडे, ना धड तिकडे अशीच त्यांची अवस्था असते. लोक तिलाच स्वप्नाळू वृत्ती म्हणत असावेत ! बिना ध्यास नि बिना धडपडीशिवाय असलेली ही स्वप्नाळू वृत्ती तशी घातकच, नाही का ? बालपणी आम्हांला स्वप्नांचा खरा अर्थही काही कळत नव्हता; पण स्वप्न या शब्दाशी आमचा परिचय झालेला होता. रात्री झोपलो म्हणजे


**तुम्ही काय कराल ?**



- तुम्ही चांगले धावपटू आहात. शाळेच्या क्रीडासंमेलनात धावण्याच्या स्पर्धेत पहिले बक्षीस मिळवायचे, हे तुमचे स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण होण्याकरिता तुम्ही कोणते प्रयत्न कराल ?

आपल्याला झोपेत जे दिसतं, ते स्वप्नं असतं आणि ते काही खरं नसतं, असं आम्हांला माहीत झालं होतं.

आमच्या लहानपणी कोण्या एका गावाकडून एक स्वप्नं विकणारा माणूस घोड्यावर बसून आमच्या गावाकडे यायचा. त्याच्या घोड्याचा 'टबडक् टबडक्' आवाज आला, की आम्ही आवाजाच्या दिशेनं धावत जायचो. आमचं आकर्षण 'घोडा बघणं' हे असायचं; पण घोड्यासोबत मिशीतल्या मिशीत हसणाऱ्या त्या माणसालाही बघणं व्हायचं. तलम रेशमी धोतर, त्यावर तसाच जरीचा सैलसर कुडता, डोक्याला लाल-पांढरा फेटा, डोळ्यांवर चश्मा, पायांत चामडी बूट, गव्हाळ रंगाचा, झुबकेदार मिश्या असलेला हा माणूस होताही तसाच धिप्पाड. या स्वप्नं विकणाऱ्या माणसाची आम्हांला गंमतच वाटायची, शिवाय कुतूहलपण. त्यानं घोड्याच्या पाठीवर ठेवलेल्या मखमली कापडातल्या गाठोड्याकडे आम्ही कुतूहलानं बघायचो.



हा माणूस आमच्या गावच्या पिंपळाच्या पारावर थांबायचा. पाराला असलेल्या लोखंडी कडीला आपला घोडा बांधायचा. घोड्याच्या पाठीवर आणलेलं मखमली कापडातलं गाठोडं जवळ घेऊन, चामडी पिशवीतलं पाणी घटाघटा प्यायचा आणि मग ऐटीत झाडाच्या पारावर बसायचा, तेव्हा त्याच्याभोवती माणसांचा गराडा पडे. त्यानं आजवर घोड्यावरून खूप प्रवास केलेला होता. कित्येक प्रदेश पाहिले होते. कित्येक डोंगरदऱ्या तुडवल्या होत्या. भिन्न स्वभावांची आणि भिन्न संस्कृतींची माणसं पाहिली होती, त्यामुळे त्याच्याकडे बोलण्यासारखं खूप काही असायचं. त्यानं अनुभवलेलं समृद्ध विश्व तो वेगवेगळ्या किश्श्यांनी रंगवून, फुलवून सांगायचा. लोक त्याच्या गप्पांमध्ये स्वत:ला विसरून जायचे. त्याचं ते भलतंच दिलखेच बडबडणं आणि स्वप्नात धुंद गुंगवणं लोकांना भारी आवडायचं. ऐकताना लोकांची मती कुंठित व्हायची. आपण ऐकतोय ते खरं की खोटं या संभ्रमात ते पडायचे.

ऐकताना लोक तल्लीन होऊन जायचे. त्याच्या त्या अनुभवी बोलांतून लोकांना निरनिराळ्या प्रांतांची, रीतीरिवाजांची माहिती व्हायची. त्यानं वर्णन केलेल्या प्रांतात ते मनानंच भटकून येत. जणूकाही आपण स्वप्नातच आहोत, असं त्यांना वाटत राहायचं. मग बऱ्याच वेळानं तो, ते मखमली कापडात बांधलेलं गाठोडं हळूच सोडायचा. त्यात काजू, बदाम, किसमिस, वेलदोडे, सुपारी, खारीक, खोबरं वगैरे असायचं. नाही म्हटलं, तरी लोक घासाघीस करून छटाक-पावशेर विकत घ्यायचेच ! कधीकधी तो गाठोड्यातला खाऊ सगळ्या टिंगू

मुलांना मूठमूठ वाटून द्यायचा. आम्हीही त्याच्यावर भलतेच खूश व्हायचो.

तो निघून गेल्यावर मग लोक म्हणत, 'हा बडबड्या आला, की आपल्यात तरतरी पेरून जातो. त्याच्या बोलण्यानं जगाची ओळख झाल्यासारखं वाटतं. आपलं दु:ख काही काळापुरतं का होईना विसरल्यासारखं होतं. गोडगोड बोलून तो जसं त्याचं स्वप्नच आपल्या डोळ्यांत उतरवून जातो...' पुढे मग लोक त्याला 'सपनविक्या'च म्हणू लागले. त्यालाही त्याचं काहीच वाटेना. तोही मग गमतीनं 'सपन घ्या, सपन' म्हणतच गावात शिरायचा आणि लोकांना रिझवून सुकामेवा विकायचा.

काय झालं कळलंच नाही; पण अचानकच सपनविक्या गावात यायचा बंद झाला. आम्ही रोज त्याची आतुरतेनं वाट पाहायचो; पण तो यायचाच नाही. कधीतरी त्याचा विषय निघायचा अन् गावातले सगळे लोक त्याच्याविषयी भरभरून बोलायचे. महिने, वर्षं उलटून गेली.

एके दिवशी अचानक, एक तरुण गावात आला. गावातल्या पारावर बसला. गावातील पारावर बसलेले लोक त्याच्याकडे टकामका पाहू लागले. तो तरुण सपनविक्यासारखाच दिसत होता. तोच चेहरा, तीच अंगकाठी, जणू सपनविक्याच गावात आला होता. आम्ही सगळी मुलं पाराजवळ जमलो. आमच्या गावातल्या सगळ्यांत वृद्ध तात्यांनी त्याला विचारलं, ''कोण रे बाबा तू? कुठून आलास?''

तो म्हणाला, ''मी तुमच्या सपनविक्याचा मुलगा. गुडघेदुखीच्या त्रासामुळे बाबा बऱ्याच वर्षांपासून गावोगावी जाऊ शकत नाहीत; पण खरं सांगू का? गावांत जाणं, तिथल्या लोकांना एकत्र जमवणं, त्यांच्याशी बोलण्यासाठी सुकामेवा विकणं हे केवळ बाबांचं एक निमित्त होतं. त्यातून त्यांना खूप आनंद मिळत असे. 'आपले अनुभव, आपल्याजवळचं ज्ञान इतरांना सांगावं, दुसऱ्यांना आनंद द्यावा' असं माझ्या वडिलांचं स्वप्न होतं. लोकांची सेवा करण्याचा त्यांचा हा मार्ग मला खूप खूप आवडला. नुकतंच माझं वैद्यकीय शिक्षण पूर्ण झालं आहे. गावोगावी जाऊन वृद्ध, आजारी लोकांची सेवा करायची, असं मी मनोमन ठरवलं आहे. बाबांचं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठीच मी तुमच्या गावात आलो आहे.''

त्याचा आवाज, बोलण्याची ढब, हसणं आम्हांला सपनविक्याची तीव्र आठवण देऊन गेलं. आम्ही सगळे गहिवरून गेलो. काय बोलावं हे कोणालाच समजेना. असंही स्वप्न असतं, एखादा माणूस असंही स्वप्न पाहू शकतो, हे नव्यानंच आम्हांला उमगलं होतं.

***

## स्वाध्याय



**प्र. १. तुमचे मत स्पष्ट करा.**

(अ) गावात येणाऱ्या माणसाला गावकरी 'सपनविक्या' म्हणत.

(आ) स्वप्नं विकणाऱ्या माणसाचा गावात येण्यामागचा उद्देश.

**प्र. २. स्वप्नं विकणाऱ्या माणसाचे खालील मुद्द्यांच्या आधारे दोन-दोन वाक्यांत वर्णन करा.**

**स्वप्नं विकणारा माणूस**

त्याचा पेहराव | त्याचे बोलणे | त्याचे स्वप्न


**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कथा प्रसंगानुसार वाचून घ्यावी, तसेच या कथेचे सादरीकरण करून घ्यावे. वर्तमानपत्रे, मासिके यांमध्ये आलेल्या विविध कथांचा संग्रह करून घ्यावा. त्या कथांचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक प्रकट वाचन करून घ्यावे.

**प्र. ३. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ)




(आ)




(इ)




(ई) स्वप्नं विकणाऱ्याचे किस्से
ऐकणाऱ्यांचे फायदे



**प्र. ४. स्वप्नं विकणारा माणूस गावात आल्यापासून गाठोडे सोडेपर्यंतच्या घटनांचा ओघतक्ता तयार करा.**

उदा., (१) पिंपळाच्या पारावर थांबणे.

(२)

(३)

(४)



**प्र. ५. कल्पना करा व लिहा.**

स्वप्नं विकणारा माणूस तुम्हांला भेटला आहे व त्याच्याशी तुमचा संवाद झाला आहे.



**चर्चा करूया.**



झोपेत असताना आपणांस स्वप्नं का पडत असतील, याबाबत विचार करा. घरातील मोठ्या व्यक्तींशी किंवा मित्रांबरोबर याविषयी चर्चा करा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) पार–झाडाच्या बुंध्याजवळ बसण्यासाठी सभोवताली बांधलेला ओटा, पार–पलीकडे. असे 'पार' या शब्दाचे दोन अर्थ होतात. लक्षात ठेवा–संदर्भानुसार शब्दांचे अर्थ बदलू शकतात. खालील शब्दांचे प्रत्येकी दोन अर्थ लिहा.**

(अ) हार (आ) कर (इ) वात

**(आ) खाली दिलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) मती कुंठित होणे. | (अ) कंठ दाटून येणे. |
| (२) तरतरी पेरणे. | (आ) विचारप्रक्रिया थांबणे. |
| (३) गहिवरून येणे. | (इ) उत्साह निर्माण करणे. |


**(इ) खाली दिलेल्या शब्दांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

(अ) कुतूहल (आ) संभ्रम (इ) ढब (ई) आतुरतेने

**उपक्रम :**

(१) 'या बालांनो या रे या' हे गीत मिळवा व परिपाठात सादर करा.

(२) तुमच्या गावात/परिसरात येणाऱ्या अशा काही व्यक्ती आहेत, ज्यांची तुम्ही आतुरतेने वाट पाहत असता. उदा., फुगेवाला, आइस्क्रीमवाला. अशा एखाद्या व्यक्तीची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.



## खेळ खेळूया.

चला मुलांनो, आज आपण एक छानसा खेळ खेळूया. तुम्हांला दिलेल्या अक्षराने सुरू होणाऱ्या गावाचे नाव सुरुवातीला लिहायचे आहे. त्याच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणाऱ्या दुसऱ्या गावाचे नाव लिहायचे. पुन्हा एकदा त्याच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणाऱ्या तिसऱ्या गावाचे नाव लिहायचे. आता तिसऱ्या गावाच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणारे गावाचे नाव लिहायचे; पण अशा गावाचे नाव लिहायचे आहे, ज्याचे शेवटचे अक्षर 'र' असेल. बघूया जमते का ते!

अशाप्रकारे मुले, मुली, फळे, फुले, पक्षी, प्राणी यांची नावे घेऊन गटागटांत हा खेळ खेळता येईल. यातून तुमची शब्दसंपत्ती वाढेल.

उदा., **स** – सोलापूर
**र** – रांजणगाव
**व** – वडनेर
**र** – रावेर

(१) **म** ________
________
________
________ **र**

(२) **ख** ________
________
________
________ **र**

(३) **क** ________
________
________
________ **र**

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

मी शाळा जातो.

मी शाळेत जातो.

ही दोन वाक्ये तुम्ही वाचलीत. यांपैकी पहिले वाक्य चुकीचे आहे आणि दुसरे वाक्य बरोबर आहे. या दोन्ही वाक्यांमध्ये काय फरक आहे? पहिल्या वाक्यात 'शाळा' हा शब्द आहे. दुसऱ्या वाक्यात 'शाळा' या शब्दाला '-त' हा प्रत्यय लागला आहे.

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) राम मित्राशी बोलतो.

(२) रेश्मा पालीला घाबरते.

(३) कल्पना दुकानात जाते.

या वाक्यांमध्ये,

| **नाम** | **+** | **प्रत्यय** |
|---|---|---|
| मित्र | + | -शी |
| पाल | + | -ला |
| दुकान | + | -त |

मित्र, पाल, दुकान या नामांना अनुक्रमे -शी, -ला, -त हे प्रत्यय जोडलेले आहेत. प्रत्यय लागण्यापूर्वी या शब्दांमध्ये काही बदल झाले आहेत. उदा., मित्र~मित्रा-, पाल~पाली-, दुकान~दुकाना-. शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी होणाऱ्या या बदलाला शब्दाचे **सामान्यरूप** म्हणतात. शब्दाच्या मूळ रूपाला **सरळरूप** म्हणतात. उदा., 'दुकान' हे सरळरूप आणि दुकाना- हे सामान्यरूप.

नामांना किंवा सर्वनामांना लागणारे प्रत्यय अनेक प्रकारचे असतात. -ला, -त, -ने, -शी, -चा, -ची, -चे इत्यादी.

**लक्षात ठेवा :** काही वेळा शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाच्या रूपात बदल झालेला दिसत नाही. उदा., खिडकी, खोली यासारखी ईकारान्त स्त्रीलिंगी नामे.

- **आता एक मजेदार खेळ खेळूया.**

शब्दाचे सामान्यरूप न करता काही वाक्ये तयार करा. ती मोठ्याने वाचा. नंतर सामान्यरूपासह ती पुन्हा तयार करा. लिहिताना एक गोष्ट नीट लक्षात ठेवा, की सामान्यरूपातला शब्द आणि त्याचे प्रत्यय जोडूनच लिहायचे असतात. उदा., रवी ने पाल ला मारले. ✗

रवीने पालीला मारले. ✓

घोडा, माळ, पाल, घर, दुकान ही सामान्यनामे आहेत; पण अंजली, सुजाता, राजीव ही विशेषनामे आहेत. विशेषनामांना प्रत्यय लावताना त्यांचे सामान्यरूप होत नाही. उदा., अंजलीला, सुजाताला, राजीवला.

बोलींमध्ये आणि जुन्या मराठीत विशेषनामांची सामान्यरूपे दिसतात. आज ती कमी होत चालली आहेत. पौराणिक पात्रांची नावे मात्र सामान्यरूपात लिहितात. रामाने, दशरथाने, सीतेने, कृष्णाने इत्यादी; पण हीच नावे आताच्या जगातल्या माणसांची असतील, तर सहसा सामान्यरूप होत नाही हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगावे.

✻ अडनावांचे सामान्यरूप होते. उदा., गायकवाडांना, सान्यांना, जोगळेकरांना वगैरे; पण लिहिताना शक्यतो सामान्यरूप न वापरता 'गायकवाड यांना', 'साने यांना' असे लिहितात.

✻ गावांच्या, राज्यांच्या नावांचेही सामान्यरूप होते. उदा., गोवा-गोव्याला, बडोदा-बडोद्याला, पुणे-पुण्याला.

ईकारान्त व अकारान्त नामे बऱ्याचदा बदलत नाहीत, हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावे.

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) ही माझी नवी छोटी शाळा.

या वाक्यात 'ही', 'माझी', 'नवी', 'छोटी' हे सारे शब्द 'शाळा' या नामाची विशेषणे आहेत.

आता हे वाक्य वाचा.

(२) ह्या माझ्या नव्या छोट्या शाळेत क्रीडांगणसुद्धा आहे.

तुमच्या लक्षात आले का, 'शाळा' या नामाला प्रत्यय लागल्यावर 'ही', 'माझी', 'नवी', 'छोटी' ह्या विशेषणांचे रूपसुद्धा बदलले. ते शब्द 'ह्या, 'माझ्या' 'नव्या', 'छोट्या' असे बदलले. याला विशेषणाचे सामान्यरूप म्हणतात. जेव्हा नामाचे सामान्यरूप होते तेव्हा विशेषणांचेपण सामान्यरूप होते; पण त्यांना कुठलाही वेगळा प्रत्यय लागत नाही.

- **आता तुम्ही या उदाहरणाप्रमाणे खालील तक्ता पूर्ण करा.**

| ही | माझी | नवी | छोटी | शाळा | ह्या | माझ्या | नव्या | छोट्या | शाळेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | पुस्तक | - | - | - | - | पुस्तकात |
| - | - | - | - | पंखा | - | - | - | - | पंख्याला |
| - | - | - | - | पुस्तके | - | - | - | - | पुस्तकांमध्ये |

तुमच्या हेही लक्षात आले असेल, की नाम पुल्लिंगी असो, स्त्रीलिंगी असो वा नपुंसकलिंगी, एकवचनात असो की अनेकवचनात, त्याच्या विशेषणांचे सामान्यरूप फक्त 'या' लागून होते.

आहे ना गंमत !

- **अधोरेखित शब्दांविषयी खालील माहिती भरून तक्ता पूर्ण करा.**

| वाक्ये | सरळरूप | सामान्यरूप | प्रत्यय |
|---|---|---|---|
| (१) रमेशचा भाऊ शाळेत गेला. | (१)<br>(२) | | |
| (२) बँकेने शेतकऱ्याला कर्ज दिले. | (१)<br>(२) | | |
| (३) सुट्टीत तो मित्रांशी खेळतो. | (१)<br>(२) | | |
| (४) मंडईत फळांच्या गाड्या आहेत. | (१)<br>(२) | | |

# ३. तोडणी

**दत्तात्रय विरकर** (१९६५) : विविध वृत्तपत्रे व मासिके यांतून कथा व कवितांचे लेखन. वाटणी, तोडणी या कथा प्रसिद्ध. ऊसतोडणी कामगारांच्या समस्यांचे वास्तव या कथांतून मांडले आहे.

वसंत व मीरा या ऊसतोडणी कामगाराच्या मुलांच्या मनातील शिक्षणाविषयीची तीव्र ओढ प्रस्तुत पाठात व्यक्त केली आहे.

**माहिती घ्या.**

- शेतीच्या खालील कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांची माहिती घ्या व नावे लिहा.
  (अ) खुरपणी.
  (आ) बांध घालणे.
  (इ) पेरणी.
  (ई) नांगरणी.

गाव सोडून गाडीत बसल्यावर सगळ्यांच्या डोळ्यांसमोर फक्त ऊस दिसत होता. निघाल्यापासून गावाकडच्या विचारानं सगळ्यांच्या मनात काहूर उठलं होतं. परक्या गावात आपण केव्हा आलो हे तारा अन् शंकरला उमगलंच नाही. सगळ्या तोडणीवाल्यांनी मराठी शाळेजवळच्या मोकळ्या जागेत गाड्या सोडल्या. बैलांच्या मानेवरचं जू खाली ठेवताच सगळी बैलं शेपटी अंगावर मारत अंग खाजवायला लागली. बायकांनी गाडीजवळच चुली पेटवल्या. बाप्या माणसांनी बैलं अन् पोरांनी बादल्या, कळश्या घेतल्या व नदीवर गेली. दामूनंही आपली बैलं नदीवरून पाणी पाजून आणली. मीरा अन् वसंतानं झिऱ्यावर पाण्यासाठी नंबर लावला होता. तारानं भाकरी थापून तव्यावर पिठलं टाकलं तेवढ्यात पोरं पाणी घेऊन आली. 'आवं पाचूंदा सोडा,' लक्ष्मीनं दिलेला आवाज दामूनं ऐकला आणि पाचूंदा सोडून गुडघ्यानं सरमड कडाकडा मोडून बैलांसमोर सारलं. तसा रामा, धोंडू, शंकर सगळ्यांनी आपआपल्या परीनं बैलांसमोर सरमड मोडून टाकलं. पिठलं-भाकरी पोटात ढकलून सगळ्यांनी अंथरुणं पसरली.

तांबडं फुटताच तारा झटकन अंग झटकून उठली. तिनं जर्मनच्या पातेल्यात चहा ठेवला. शंकर जांभई देत उठला. त्यानं अंथरुणाची वळकटी केली. तारानं तोंडावर पोचारा मारला नि बिनदांडीच्या कपात लाल चहा शंकरच्या पुढ्यात केला. 'हं घ्या, च्या घ्या.' शंकरनं चहाचा कप हातात घेतला. 'शंकर ! अरे ये शंकर...आरं मामू चिठ्ठी देऊन गेलाय, थळात जायचंय. निघाया पायजे.' दामूचा आवाज कानावर पडताच 'हा आलू.... आलू', असं म्हणून शंकरनं घटाघटा चहा पोटात ढकलला. सगळ्यांनी नदीच्या काठावर मोकळ्या रानात सामान उतरवलं अन् थळाचा रस्ता धरला. शंकर-तारानंही आपला कोयता सोबतीला घेऊन मीरा अन् वसंतला बरोबर घेतलं. आज 'ऊसतोडणी'चा पहिला दिवस असला, तरी उघड्यावर झोपून थंडीनं अंग काकडून निघतं, म्हणून दुपारीच थळातून लवकर परतायचं, असं सगळ्यांनी ठरवलं होतं. थळात पाय ठेवताच शंकरनं उसावर घाव घालायला सुरुवात केली. मीरानं मोळ्या बांधल्या. दिवस माथ्यावर केव्हा आला ते समजलंच नाही. हिरवा चारा मिळाल्यानं बैलं मस्त जोगली होती.

सगळ्यांनी वाढे टाकून शंकूच्या आकाराच्या कोप्या बांधून सामान लावलं, तसं तारानंही सामान लावून चिमणीचा उजेड करताच मीराला वसंताचं पुस्तक गवसलं. 'वश्या तुपलं पुस्तक...वश्या तुपलं पुस्तक.' मीराचा आरडाओरडा ऐकून वसंतला शाळेची आठवण झाली अन् वसंत कोपीबाहेर बसलेल्या शंकरच्या मागे जाऊन उभा ठाकला. त्यानं शंकरच्या खांद्यावर हात ठेवून विचारलं, 'दादा, मले साळांत कवा धाडणार ?' थळामध्ये जोशात काम करणाऱ्या वसंतला शंकरनं पाह्यलं असल्यानं 'साळा बिळा काय बी नाय, बस

झाली आता तुपली साळा. खाऊन घे...आन् झोप. तांबड्यात तोडीला जायचं हाय. जा, झोप जा,' असं म्हणून गप्प केलं. शंकरच्या मागे उभं राहून खांद्यावर हात ठेवून विचारताना उसाच्या पाचटानं साळलेल्या अंगावरच्या खुणा पाहून वसंत हबकून गेला होता. त्याच्या मनात शिक्षणाविषयीची उलघाल होत होती. शंकरच्या बोलण्यानं वसंत उपाशीच झोपला, तर मीराला फार वाईट वाटलं.

कोपीबाहेर अंधूक उजेडात तारानं चूल शिलगावून तवा ठेवला. भाकरी थापण्याच्या आवाजानं वसंतला जाग आली. शंकरनं नदीवर जाऊन गुंडभर, तर मीरानं कळशीभर पाणी आणलं. शंकरनं थळात जायची तयारी चालवली होती. मीरानं पाट्यावर मिरचीचं वाटण वाटून आईकडे दिलं. 'मिरे अगं आवर लवकर, त्या वश्याला उटीव. आरं आवरा लवकर, गाड्या निघाल्या.' शंकरच्या आवाजानं तारानं कालवणाला फोडणी दिली. सगळ्यांच्या गाड्या वाटेला लागल्या. शंकरनंही आपली गाडी जुंपली. तारा धुडक्यात कोयता, भाकरीचं पेंडकं अन् कालवण घेऊन गाडीत बसली, तशी मीराही परकर सावरत बसली. वसंत कोपीमागं खुटून बसला होता. तारानं वसंतपाशी जाऊन समजूत काढून त्याला गाडीत बसवलं अन् गाडी फुपाट्याच्या रस्त्यानं वाटेला लागली.

शंकर आणि तारा उसावर घाव घालत होते, तर मीरा अन् वसंत त्याच्या मोळ्या बांधून सडकेला आणून टाकत होते. सडकेवर पडलेल्या कागदावर वसंतची नजर खिळली, तसा वसंतनं कागद उचलून हातात धरला; पण कागदावरच्या संस्कृतमधल्या शब्दांचा उलगडा नीट होत नव्हता. रस्त्यावर सापडलेल्या कागदावरचे शब्द वसंतनं आईला वाचायला लावताच, 'पोरा, मले तरी कुटं वाचता येतंय, मपली साळा तर दुसरीच झालीय', असं आई म्हणाली. कागदावरच्या शब्दांचा मीराकडूनच नीट उलगडा होईल याची वसंतला खात्री होती, कारण मीराचंही शिक्षण कसंबसं आठवीपर्यंत झालं होतं. तो धावत जाऊन तिला म्हणाला, ''ताई, मला सडकेवर कागद गवसला. त्यावर काय लिव्हलंय बग, काईच कळत नाईये.''

पोराचं शिक्षण अर्धवट राहायची भीती ताराच्या मनात आल्यानं तिनं शंकरला बोलतं केलं. ''पोराचं शिक्षण तोडलं तुमी, कामाला हातभार लागतो...पण त्याच्या आयुष्याचं काय?'' ''अगं व्हईल समदं, आता कुटं गाडी जरासी रुळावर आलीय.'' घाव घातलेला ऊस ताराकडे देत शंकर बोलला.

मीरानं डोक्यावरील मोळी खाली ठेवली. मीरा वसंताच्या हातातील कागद पाहू लागली. वसंत



उत्कंठतेनं मीराकडे बघत होता. ''ही वळ व्हय? हे तर संस्कृतमधलं वाक्य हाय. 'तमसो मा ज्योतिर्गमय' असं लिव्हलंय,'' मीरा म्हणाली. ''म्हणजे काय गं ताई?'' वसंतनं विचारलं. ''तमसो मा ज्योतिर्गमय, म्हंजी अंधारातून उजेडाकडं,'' मीरानं सांगून टाकलं. ''म्हंजे ग ताई?'' पुन्हा वसंतनं विचारलं. ''आता तुला कसं सांगू? हे बघ वश्या, तुला संस्कृतमधलं वाक्य वाचता आलं न्हाई म्हंजी अंधार, अन् पुढल्या वर्गात जाऊन शिकलास तर ...'' मीराचं बोलणं पुरं व्हायच्या आतच ''तर काय व्हईल?'' वसंतनं विचारलं. ''तर वाचता येईल म्हंजी उजेड, म्हंजी अंधारातून प्रकाशाकडं,'' असं म्हणत मीरा माघारी फिरली. तितक्यात वसंतनं मीराचा हात धरून थांबवत म्हटलं, ''अगं, पण दादानंच शिक्षण तोडलं तवा वाचायला तरी कसं येणार? ताई, काही झालं तरी मी शिकणारच.'' त्यांचं हे बोलणं ऐकून

तडातडा तुटणाऱ्या उसागत वसंतचंही शिक्षण तुटत असल्याची जाणीव शंकरला झाली.

बाजार असल्यानं आज 'तोडणी' बंद होती. आजूबाजूच्या कोप्यावरली सारी पोरं साखरशाळेत गेल्यानं वसंत एकटाच कोपीबाहेर बसून काय करावं, या विचारात होता. शेजारच्या कोपीतून दामूची बायको लक्ष्मी कालवणाच्या फोडणीचं वाटण वाटायला बाहेर आली. पाट्यावर मीठमिरची वाटता वाटता लक्ष्मीनं वसंताकडे पाहिलं. ''वश्या, तू आज साळंला न्हाई गेलास व्हय रं?'' वसंतनं हातातला खडा खाली फेकत 'कसा जाणार?' म्हणत मानेला झटका देत तो कोपीत शिरला. ''आवं ओ वसंताची माय,'' असं म्हणत लक्ष्मीनं ताराला साद घातली. ''आले ओ माय... आले...आले,'' म्हणत खाली वाकत कोपीबाहेर आलेल्या ताराला पाहून ''आवं समदी लेकरं साळंला गेली, आन् तुपलं?''

वाटणाची परात हातात घेत लक्ष्मी उभी राहिली. बाजार घेऊन आलेल्या दामू अन् शंकरकडे लक्ष्मीची नजर जाताच शंकरकडे हात दाखवत, ''हे बघा, यास्नीच इचारा की, का साळंला गेला न्हाई म्हणून,'' लक्ष्मीकडे पाहत तारा उत्तरली. लक्ष्मीनं शंकरकडे नजर लावून, ''कावं भावजी, आपल्या समद्यांची पोरं साखरसाळंला जात्यात, मग याला कशापाई घरी ठिवलं? त्याचं शिकायचं वय हाय तर शिकू द्या की, मोटा झाला की कामच करणार हाय.''

''व्हय व्हय, म्या बी त्येच म्हंती. हिचं बी शिकणं अर्धंच ऱ्हायलं.'' मीराच्या डोक्यावरून हात फिरवत तारानं लक्ष्मीच्या बोलण्याला साथ दिली. तारानं स्वत:च्या शिक्षणाची आबाळ झाल्याचं म्हणत मीराच्या शिक्षणाची स्तुती केली अन् शंकरला म्हणाली, ''आवं ही लक्ष्मी माय काय म्हंतीया ते तर बघा. वश्याला साळंला घाला म्हंतीया. थोडंसं पैकं कमी मिळंल, पण तो आपल्यासारखा अडाणी तर न्हाई ना ऱ्हाणार. जाऊ द्या त्यास्नी साळंला.'' शंकर म्हणाला, ''लक्ष्मी वैणी समदं खरंय, पण...'' हातातली बाजाराची थैली ताराकडे देत शंकरनं मान फिरवली. ''आता पनबीन काय बी सांगू नगंस. उद्यापास्नं त्येला साळंला धाड.'' सगळं बोलणं ऐकल्यानं दामूनं तोंड उघडलं. कोपीबाहेर चाललेलं सगळं बोलणं आपल्याविषयी असल्यानं वसंतला उभारी आली अन् तो कोपीबाहेर येऊन उभा राहिला. ''आता समदीच म्हणत्यात तर जाऊ द्या, नाई म्हणू नका. पुढला इचार करा.'' तारा म्हणाली. वसंताकडे पाहत 'ये, पोरा ये' म्हणून त्याला जवळ घेत तारानं वसंतला कुरवाळलं.

''आता तुमी समदीच म्हंत्यात तर म्या तरी कशाला आडवा येवू? वसंता, ये इकडं पोरा. आता तू उद्यापास्न साळंला जायचं बरं का! हे बघ पुढल्या बाजारी आपण तुझ्यासाठी पेन आणू.'' वसंताला जवळ घेऊन पाठीवरून हात फिरवत शंकर म्हणाला. मीराच्याही आनंदाला पारावार राहिला नाही. तिचेही डोळे पाण्यानं भरले. वसंतनं लगेच मित्रांना गाठलं. 'आता म्या साळंला येणार,' असं वसंता सगळ्यांना सांगत सुटला.



***

## स्वाध्याय

**प्र. १. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) मीराने वसंतला 'तमसो मा ज्योतिर्गमय'चा सांगितलेला अर्थ.

(आ) वसंतच्या मनातील शिक्षणाची ओढ.

(इ) 'अगं, पण दादानंच शिक्षण तोडलं तवा वाचायला तरी कसं येणार?' या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ.

**प्र. २. वसंतचे शिक्षणाबाबतचे प्रेम दर्शवणारी वाक्ये पाठातून शोधून लिहा.**

**प्र. ३. खालील आकृतीत योग्य शब्द लिहा.**

(अ) बैलांचे खाद्य. [ ]

(आ) ऊसतोडणी कामगारांच्या मुलांची शाळा. [ ]

**प्र. ४. तुम्हांला कथेतील कोणते पात्र सर्वांत जास्त आवडले? सकारण सांगा.**

**प्र. ५. खालील आकृतीत दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे माहिती लिहा.**

मराठी शाळेजवळच्या मोकळ्या मैदानात गाड्या सोडल्यावर खालील व्यक्तींनी काय काय केले?

मीरा, वसंत | इतर बायका | दामू | तारा

## खेळूया शब्दांशी.

**(अ) गटात न बसणारा शब्द शोधून लिहा.**

(१) श्रीमंत, धनवान, गरीब, लखपती.

(२) रात्र, निशा, प्रभात, यामिनी.

(३) अशिक्षित, निरक्षर, अंगठाबहाद्दर, शिक्षित.

(४) गवसणे, मिळणे, हरवणे, सापडणे.

**(आ) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांच्या रूपात योग्य बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(आनंदाला पारावार न उरणे, हबकून जाणे, हातभार लावणे, आबाळ होणे.)

(१) वडिलांच्या नोकरीनिमित्त सतत होणाऱ्या बदल्यांमुळे केशवच्या शिक्षणाची .............. .

(२) गावाहून आलेल्या आजीला पाहून नंदाच्या.............. .

(३) सिमरन आईला घरातल्या कामांसाठी.............. .

(४) रस्त्यावर जोरजोरात भुंकणाऱ्या कुत्र्यांना पाहून रेश्मा.............. .

(इ) खालील शब्दांना 'पर' हा एकच शब्द जोडून नवीन अर्थपूर्ण शब्द तयार होतात. ते बनवा. मराठी भाषेतील अशा विपुल शब्दसंपत्तीचा अभ्यास करा. त्याप्रमाणे वेगवेगळे शब्द तयार करा.

**पर** ← प्रांत उदा.,परप्रांत.
- भाषा
- देश
- ग्रह
- राष्ट्र

(ई) खालील शब्दांत लपलेला अर्थ शोधून लिहा.

(१) तांबडं फुटलं.

(२) गाडी रुळावर आली.

(३) अंधाराकडून उजेडाकडे.

(४) चूल शिलगावली.

(उ) खालील वाक्ये प्रमाणभाषेत लिहा.

(१) ' पोरा, मले तरी कुटं वाचता येतंय. '

(२) ''अवं समदी लेकरं साळंला गेली आन् तुपलं?''

(३) ''आता तुमी समदीच म्हंत्यात तर म्या तरी कशाला आडवा येवू?''

(४) ' आता म्या साळंला येणार. '

(ऊ) खालील विषयासंदर्भात तुमच्या मनातील भावना व्यक्त करा.



**शाळेचा पहिला दिवस**
- शाळेची इमारत
- नवीन पुस्तकांचा सुगंध
- नवीन मित्र
- वर्गशिक्षक
- आनंद

## माहिती मिळवूया.



- साखरशाळा कोणत्या मुलांसाठी असते?
- ही शाळा कोठे भरते?
- साखरशाळा कशासाठी सुरू झाल्या आहेत?



## लिहिते होऊया.

- साखरशाळेत जाणाऱ्या राजेशला तुम्ही अभ्यासाबाबत कोणती मदत कराल?

**उपक्रम :**

'सा विद्या या विमुक्तये' हे ब्रीदवाक्य आहे. प्रत्येक संस्थेला, शाळेला, मंडळाला आपले स्वत:चे असे ब्रीदवाक्य असते. अशी ब्रीदवाक्ये मिळवा. या ब्रीदवाक्यांचा अर्थ समजून घ्या.

भाषेचा नमुना

## अहिराणी बोली

*गावात तात्यावाचून पान हालानं नही. मानोस काही सिकेल व्हता आसे नही. पन कोनी काय टाप त्याले आंग्ठेबहादूर म्हनानी? चांग्ला जुनी फायनल व्हयेल व्हई आसे वाटानं. तात्या ह्या चार भाऊ, तिन्ही भाऊ वावरात काम कराना. तात्याले वावरात जावानी कदी पाळी वनी नही. तात्या घरना कारभारी, घरना जस्या कारभारी तस्या गावनाभी कारभारी. चोवीसतास भायेरल्याज उट्यारेट्या करी ऱ्हावाना. गावातला लोकंभी त्याले सळ खाऊ देवाना नही.*

*गावात कोनाकडे मांडोना बेत ऱ्हावो, तात्या पायजेच. साखरपुडा, नारळ ऱ्हावो तात्या पायजेच. कोना वाटा पाडाना ऱ्हावोत, तात्या पायजेच. सायखडं घी जावाले तात्याना नंबर पयला, वावरातल्या बांधवरथून कज्या ऱ्हावोत मिटाडाले तात्या पायजेच. पंगतम्हानभी बसा मंडळी आसे म्हनालेभी तात्याज पायजे. म्हंजे मरनदार ऱ्हाव का तोरनदार ऱ्हाव, तात्यासवाई पान्टं हालानं नही. तात्यानीभी भू सिफरत व्हती. सग्ळी जागावर तात्या हजर ऱ्हायना नही आसे कदीज जये नही. सकाळीजना पाऱ्हे तात्या जस्या दखावाना तस्याज ताजावताना रातलेभी दखावाना. याळम्हान कव्हळज तोंडवरथून पानी फिरावाना नही, तरी तात्यानी तोंड आत्तेज धुयेल व्हयी आसे दखावानं. तात्याना कप्डा धुवळाफूल ऱ्हावाना. टोपीले टार्च दियेल ऱ्हावानी. आठोडाभर तात्या त्याज कप्डा वापराना, पन कधी मळेल दखावाना नहीत. तात्या पारवर बसाना, वावरातली कज्या मिटाडाकरता तात्या गाडावर बसीसन वावरात जावाना, पांदीधरी फोपाटाच फोपाटा. वावरात वारावावधननी भवरी उठानी तरी तात्याना कप्डा धुवळाफूलज दखावाना. आस्या आम्हाना तात्या कायेम रुबाबबनज जगना!*

**दिलीप धोंडगे** (१९५६) : कवी, समीक्षक, लेखक. 'शैलीमीमांसा', 'तुका म्हणे भाग १ व २', 'तुकारामांच्या अभंगांची चर्चा भाग १ व २', 'तुकोबांच्या अभंगांची शैलीमीमांसा', 'तात्पर्य', 'हरवले गाव' ही पुस्तके प्रसिद्ध.

'सांगनं नही पन सांगनं वनं' या पुस्तकातून वरील अहिराणी बोलीतील उतारा घेतला आहे.

### शोध घेऊया.



- **आपल्या महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य म्हणजे दर बारा कोसांवर बोलीभाषा बदलते. महाराष्ट्रामध्ये विविध बोलीभाषा बोलल्या जातात. अशा बोलीभाषांची आंतरजालाच्या साहाय्याने माहिती मिळवा. कोणत्या भागात कोणती बोली बोलली जाते, त्याची नोंद करा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना अहिराणी बोलीभाषेतील वरील उतारा योग्य उच्चारांसह वाचून दाखवावा. उताऱ्यातील शब्दांचे अर्थ व भाषेचे वेगळेपण समजावून सांगावे.

# ४. श्रावणमास

• ऐका. वाचा. म्हणा.

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे.
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे!
झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे,
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे.
उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा.
बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते.
फडफड करुनी भिजले अपुले पंख पाखरे सावरिती;
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती.
खिल्लारे ही चरती रानी, गोपहि गाणी गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरे.
सुवर्णचंपक फुलला, विपिनी रम्य केवडा दरवळला,
पारिजातही बघता भामा, रोष मनीचा मावळला!
सुंदर परडी घेउनि हाती पुरोपकंठी शुद्धमती,
सुंदर बाला या फुलमाला, रम्य फुले-पत्री खुडती.
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयात,
वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे श्रावण महिन्याचे गीत!



**बालकवी**–त्र्यंबक बापूजी ठोमरे (१८९०-१९१८) : निसर्गकवी म्हणून प्रसिद्ध. बालवयातच कवितालेखनाला प्रारंभ. १९०७ साली जळगाव येथे भरलेल्या कविसंमेलनात 'बालकवी' म्हणून गौरवण्यात आले. 'बालकवींची कविता' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवीने श्रावण महिन्यातील निसर्गसृष्टीचे विलोभनीय व सुंदर वर्णन केले आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरांत व साभिनय म्हणून दाखवाव्यात. कवितांना योग्य चाली लावाव्यात. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरांत म्हणून घ्याव्यात.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रसंगी काय घडते ते लिहा.**

| प्रसंग | काय घडते |
|---|---|
| (१) पहिला पाऊस आल्यावर | |
| (२) सरीवर सरी कोसळल्यावर | |

**प्र. २. निरीक्षण करा व लिहा.**

श्रावण महिन्यातले तुम्ही
पाहिलेले आकाशातील विशेष बदल

**प्र. ३. खालील तक्ता पूर्ण करा.**

कवितेत आलेली यांची नावे

- प्राणी
- पक्षी
- फुले

**प्र. ४. 'सुंदर बाला या फुलमाला' या काव्यपंक्तीत सारख्या अक्षराचा उपयोग अधिक केल्यामुळे नाद निर्माण होतो, त्यामुळे पंक्ती गुणगुणाव्याशा वाटतात. कवितेतील अशा ओळी शोधून लिहा.**

**प्र. ५. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी लिहा.**

(अ) क्षणात पाऊस पडतो तर क्षणात ऊन पडते.
(आ) झाडांवर, घरांवर कोवळे कोवळे ऊन पडते.
(इ) हरिणी आपल्या पाडसांसह कुरणात बागडत आहेत.

**प्र. ६. कवितेच्या खालील ओळींतील भाव तुमच्या शब्दांत लिहा.**

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे.


## खेळूया शब्दांशी.

- **खालील शब्दांसाठी कवितेत आलेले समानार्थी शब्द शोधून लिहा.**

(१) बासरी – 
(२) स्त्रिया – 
(३) आकाश– 
(४) मेघ– 
(५) गुराखी– 
(६) पृथ्वी– 
(७) वृक्ष– 
(८) मुख– 
(९) राग– 

**प्रकल्प :**


बालकवींच्या आणखी निसर्गकविता मिळवा. त्यांतील तुम्हांला आवडलेली कविता परिपाठात तालासुरांत सादर करा. बालकवींच्या कवितांचा संग्रह करा.




## खेळ खेळूया.

- **खाली समानार्थी शब्दांचा जिना दिला आहे. दिलेल्या चौकटीत आडवे-उभे शब्द भरायचे आहेत. एका जिन्याच्या पायऱ्या तुम्हांला उतरून दाखवल्या आहेत. दुसऱ्या जिन्याच्या पायऱ्या तुम्हांला उतरायच्या आहेत.**

(१) मस्तक
(२) कचरा
(३) रात्र
(४) पाणी
(५) जनता
(६) मुलगी




(१) पुढारी
(२) दिनांक
(३) पक्षी
(४) आकाश
(५) डोळे
(६) आश्चर्य






## लिहिते होऊया.

- **श्रावण व वैशाख या दोन्ही महिन्यांतील निसर्गात जाणवणारा फरक तुमच्या शब्दांत लिहा.**

## आपण समजून घेऊया.

- मागील इयत्तेत आपण नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या विकारी शब्दांचा अभ्यास केला आहे.

  या इयत्तेत आपण क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये व केवलप्रयोगी अव्यये या अविकारी शब्दांचा अभ्यास करणार आहोत. क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये व केवलप्रयोगी अव्यये या शब्दप्रकारांना **अविकारी** म्हणतात, कारण लिंग, वचन, विभक्ती इत्यादींचा त्यांच्यावर परिणाम न होता त्या शब्दप्रकारांतील शब्दांच्या रूपांमध्ये काही बदल होत नाही.

- **खालील परिच्छेद वाचा.**

रवी वारंवार आजारी पडतो. त्याचे घर शाळेच्या पलीकडे आहे. मी अनेकदा त्याच्या घरी जातो. आजही गेलो होतो. मला पाहताच तो झटकन उठला. मी त्याला म्हणालो, ''तू हल्ली सारखा आजारी पडतो आहेस. मी काल तुझी खूप वाट पाहिली. मला तुझ्याशिवाय अजिबात करमत नाही. मी तुला नेहमी सांगतो, की दररोज व्यायाम कर, तुझ्या शरीराची ताकद आपोआप वाढेल.''

वरील परिच्छेदातील अधोरेखित केलेले शब्द क्रियाविशेषण अव्यये आहेत. **क्रियाविशेषण अव्यये** वाक्यातील क्रियापदाबद्दल अधिक माहिती देतात.

**लक्षात ठेवा : विशेषणे** नाम व सर्वनामांबद्दल अधिक माहिती देतात, तर **क्रियाविशेषण अव्यये** क्रियापदाबद्दल अधिक माहिती देतात.

**शिक्षकांसाठी :** क्रियाविशेषण अव्यये व त्यांचे प्रकार यांची विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक सराव करून घ्यावा. क्रियाविशेषण अव्ययांचा वापर करून वाक्ये तयार करण्यास सांगावे.

## चला संवाद लिहूया.

- पाऊस व छत्री या दोघांमधील संवादाची कल्पना करा व लिहा.





पाऊस : ..........................................................................................

छत्री : ............................................................................................

पाऊस : ..........................................................................................

छत्री : ............................................................................................

पाऊस : ..........................................................................................

छत्री : ............................................................................................

पाऊस : ..........................................................................................

छत्री : ............................................................................................

पाऊस : ..........................................................................................

## सारे हसूया.



**बंटी :** अरे मित्रा, मी अशा वस्तूचा शोध लावलाय, ज्यामधून आपण बाहेरचं सर्व काही पाहू शकतो.

**दिनू :** अरे वा! अशी कोणती वस्तू आहे ती?

**बंटी :** खिडकी.

# ५. भांड्यांच्या दुनियेत

भांडी हा मानवाच्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग आहे. धान्य साठवणे, अन्न शिजवणे, अन्न सेवन करणे इत्यादींसाठी भांड्यांचा वापर फार पूर्वीपासून होत आहे. माणसांची गरज व त्या त्या काळात उपलब्ध साधनसामग्री यांनुसार भांडी तयार होत गेली, किंबहुना होत आहेत.

भांड्यांच्या स्वरूपातील बदलांचा हा प्रवास भांडी स्वत: मुलांना सांगत आहेत.

उन्हाळ्याची सुट्टी सुरू होताच अरुण व अदिती आजीआजोबांकडे गावी पोहोचले. तिथे मामांची मुले त्यांची आतुरतेने वाट पाहत होती. आता काय, मुलांची नुसती धमाल ! आंबे, कलिंगडे, ऊस खाणे आणि विहिरीत पोहणे असा मुलांचा कार्यक्रम निश्चित असायचा. उन्हामुळे आजी त्यांना दुपारी घराबाहेर जाऊ द्यायची नाही. दुपारी मुले घरातच काही ना काही खेळ खेळायची. अशाच एका दुपारी मुले लपाछपी खेळत होती. माधववर राज्य होते. अदिती कोठीच्या खोलीत लपायला गेली. तेवढ्यात तिचे लक्ष कोपऱ्यात ठेवलेल्या जात्याकडे गेले. तिने पहिल्यांदाच जाते पाहिले होते. 'हे काय आहे?' असे पुटपुटत तिने आपल्या भावंडांना कोठीच्या खोलीत बोलावले अन् जाते दाखवले. त्यांच्याकडे पाहून जात्याने स्मितहास्य केले.



**जाते** : काय मुलांनो ! ओळखलं का मला ? मी जातं.

**अरुण** : तू इथे काय करतोस ?

**जाते** : काय सांगू तुम्हांला, आजकाल लोक माझा फक्त लग्नाची हळद दळण्यासाठीच उपयोग करतात अन् नंतर असं कोपऱ्यात ठेवून देतात. आता काय! माझे नवे मित्र, सगेसोयरे स्वयंपाकघरात विराजमान झाले आहेत.

**अदिती** : तुझे मित्र, सगेसोयरे ? कोण ते आम्हांला नाही समजलं.

**जाते** : तुम्हांला काहीच माहीत नाही आमच्याबद्दल ?

(जाते कोठीतल्या इतर भांड्यांना उद्देशून बोलते.)

सांगूया का आपण यांना, आपला जन्म, विकास आणि आपल्यात होत गेलेल्या बदलांबद्दलची माहिती ?

(कोठीतील जुन्या प्रकारची सर्व भांडी माना डोलावतात.)

**दगडी पाटा** : थांब, मी सांगतो त्यांना आपला इतिहास. बरं का मुलांनो ! मानव जसा शेती करू लागला, स्थिर जीवन जगू लागला तशी त्याला अन्न शिजवणं, अन्न साठवणं यासाठी भांड्यांची आवश्यकता वाटू लागली. या गरजेपोटी त्यानं मातीपासून मडकी, पसरट



ताटल्या, वाडगे, पराती, रांजण, घडे अशी नित्योपयोगी भांडी बनवली.

**माधव** : अरे पण, आम्ही आजही मातीच्या माठातलं थंडगार पाणी पितो. छोट्या छोट्या मडक्यांत दही लावतो; पण काय रे, माणसानं फक्त मातीचीच भांडी बनवली का ?



**माहिती मिळवा.**

- उन्हाळ्यात माठाला ओले, सुती कापड का गुंडाळतात ?
- मातीचा माठ, रांजण जमिनीत का पुरतात ?

**सुरई** : नाही, तसं नाही. मातीच्या भांड्यांबरोबरच दगडी, लाकडी, चामड्याची भांडीही मानवानं तयार केली. तुम्ही चामडी बुधले, वाळलेल्या भोपळ्यापासून बनवलेले तुंबे कधी पाहिले आहेत का ?





**मंदा** : हो हो ! मी आंतरजालावर अशा भांड्यांची खूप चित्रं पाहिली आहेत. अजूनही आदिवासी भागातील लोक अशा वस्तूंचा उपयोग करतात, हेही वाचलं आहे.

**खलबत्ता** : मुलांनो, लाकडापासून बनवलेली, भिंतीलगत ठेवलेली ही काठवट पाहा. गव्हाचं, बाजरीचं, ज्वारीचं अशी पिठं मळण्यासाठी, भाकरी थापण्यासाठी तिचा उपयोग केला जायचा. आजही ग्रामीण भागांत काही घरांतून तिचा वापर होताना दिसतो.



(काठवटही न राहवून बोलू लागली.)

**काठवट** : अगं मंदा, तुला आठवतं का ? तुझ्या आजीला आमचा नवा मित्र-मिक्सरची खूप भीती वाटायची. दाण्याचा कूट, मिरच्या, हळद, धने असं काहीबाही कुटण्यासाठी उखळ-मुसळ, दगडी खल किंवा हा खलबत्ता आजी वापरायची. पाटा-वरवंटा वापरायची.

आता तुम्हीच सांगा मुलांनो, आज उखळीमध्ये कोण पदार्थ कुटत बसतंय ? लावला मिक्सर की झालं काम. वेळ वाचतो अन् श्रमही वाचतात. पूर्वी पिठाच्या, मसाल्याच्या गिरण्या नव्हत्या. गृहिणी जात्यावर धान्याचं पीठ दळायच्या. धान्य पाखडायला सूप असायचं.





**मंदा** : हे सगळं खरं आहे; पण आज ही सर्व कामं करायला वेळ कोणाकडे आहे ?

**जाते** : मातीच्या व लाकडाच्या भांड्यांपाठोपाठ माणसानं तांबं, लोखंड या धातूंचा शोध लावला आणि मग भांडी बनवण्यासाठी त्यांचा वापर होऊ लागला; पण या धातूंच्या शोधामुळे भांडीसंस्कृती अधिक प्रगल्भ आणि विकसित होत गेली बरं का !

**अरुण** : म्हणजे फक्त भांडी बनवण्यासाठी या धातूंचा खूप उपयोग होऊ लागला, असंच तुला म्हणायचंय का ? पण जातेभाऊ, आम्ही लोखंड आणि तांबं या धातूंच्या भांड्यांबरोबर चांदीचीदेखील भांडी पाहिली आहेत.

**जाते** : पलंग, खुर्ची, टेबल, कपाट, दारं-







खिडक्या, मोठे दरवाजे यांसारख्या लोखंडापासून तयार होणाऱ्या वस्तू तुम्ही पाहिलेल्या आहेत. त्याचबरोबर स्वयंपाकासाठी लोखंडी कढई, तवा यांसारख्या भांड्यांचा वापर होतानाही तुम्ही पाहिलं आहे.

**माहिती मिळवा.**

- बांधकाम क्षेत्रात लोखंड या धातूचा उपयोग मोठ्या प्रमाणात का होत असावा?
- लोखंडाच्या कढईत वा तव्यात भाजी का करतात ?

तांबं आणि लोखंड या धातूंच्या जोडीला चांदी, शिसं या धातूंचाही वापर सुरू झाला. धातूंच्या पाठोपाठ काचेपासून वस्तू बनू लागल्या. तांबं आणि चांदीला पर्याय म्हणून संमिश्र धातू, पितळ, कांसे यांपासून भांडी बनवली जाऊ लागली.




**माहिती मिळवा.**

- भांडी बनवण्यासाठी धातूंचा वापर का सुरू झाला असावा?

**प्रशांत** : मग स्टेनलेस स्टीलची भांडी वापरात कधी आली?

**सुरई** : पितळी व तांब्याच्या भांड्यांची जागा ॲल्युमिनिअम, हिंडालियम आणि स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांनी घेतली. सध्या सगळीकडे स्टेनलेस स्टीलची भांडी बघायला मिळतात.

**जाते** : पूर्वी अंघोळीसाठी घंगाळं, पाणी तापवायला बंब, पाणी साठवायला कळशी, घागर, तपेले, हंडा असायचा; पण आता सर्रास प्लॅस्टिकच्या बादल्या, टब दिसतात.




**अरुण** : काय रे जातेभाऊ, जेवणाच्या पंगतीत ताट म्हणून केळीची पानं, पत्रावळी, तसेच वाट्यांसाठी द्रोण असायचे. हात धुवायला तस्त असायचं. होय ना?

**जाते** : अरुण, तुला बरंच माहीत आहे की! गाई-म्हशींच्या दुधासाठी कासंडी किंवा चरवी, ताकासाठी कावळा, लोण्याचा वाडगा, तुपाची बुधली, बुडकुली, ओगराळी, पळी, तसराळी, कुंडा अशा कितीतरी नावांची भांडी स्वयंपाकघरात वावरत असायची. आता स्वयंपाकघरात गॅसची शेगडी वापरत असल्यानं, चूल व त्यावर स्वयंपाक करण्याचं प्रमाणही कमी होत आहे.



**माहिती मिळवा.**

- चूल पेटवताना फुंकणीने अग्नीवर फुंकर का घातली जाते?

**मंदा** : पण या काळात मातीपासून तयार होणारी भांडी बंद झाली का?

**उखळ** : नाही, तसं नाही. या धातूंच्या शोधामुळे मातीची भांडी बनवणं बंद झालं, असं मुळीच नाही. उलट आज, भांडी तयार करण्यासाठी माती वापरण्याची परंपरा म्हणजे साहित्य संस्कृतीचा पाया मानला जातो.

**जाते** : आज मोठ्या प्रमाणावर चिनी माती किंवा सिरॅमिक्स यांचा वापर करून विविध भांडी व वस्तू तयार होत आहेत. झाकणाच्या भांड्यांचा प्रसार झाला. किटलीचा रंग, आकार, त्यावरील नक्षीकाम, तसंच रत्नजडित सुरया अशा कलात्मक गोष्टी भांड्यांमध्ये येऊ लागल्या.



**अदिती** : हो हो, हे अगदी खरं आहे. आमच्या घरी स्टेनलेस स्टील, नॉनस्टिक व कोटेड मेटलची भांडी आहेत.

**खलबत्ता** : प्रत्येकजण स्वत:च्या खिशाला परवडणारी, सहजपणे उपलब्ध होणारी आणि वापरण्यास सोपी असणारी भांडी खरेदी करण्याचा प्रयत्न करतो.

**प्रशांत** : एकूण काय, तर भांडी हे मानवी संस्कृतीचं अविभाज्य अंग आहे. गरजेनुसार भांड्यांमध्ये विविधता येत गेली असली, तरी जिथे जिथे मानवी समाज, तिथे तिथे भांडी असणारच.

**अदिती** : आज आम्हांला तुम्हां सर्वांबरोबर खूप मजा आली. आम्ही तुम्हां सगळ्यांचे खूप आभार मानतो, कारण तुम्ही आम्हांला भांड्यांच्या दुनियेची सफरच घडवून आणली!

***

**माहिती मिळवा.**

❖ चहाची किटली, कपबश्या, प्लेट्स, वाट्या इत्यादी चिनी मातीची किंवा सिरॅमिक्सची का असतात?

## स्वाध्याय



**प्र. १. खालील विधानांमागील कारणांचा शोध घ्या व लिहा.**

(अ) शेती व्यवसाय व स्थिर जीवनामुळे माणसाला भांड्यांची गरज पडली.

(आ) पूर्वी मोठ्या प्रमाणावर केळीच्या पानावर जेवण्याची पद्धत होती.

(इ) आज घरोघरी मिक्सर वापरतात.

(ई) मातीच्या भांड्यांचा जास्तीत जास्त वापर करावा.

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

मानवाने ज्या घटकांपासून भांडी बनवली ते घटक.

- ..........
- ..........
- ..........
- ..........
- ..........

प्र. ३. 'भांडी हे मानवी संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे.' या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

प्र. ४. तुमच्या घरातील निरुपयोगी वस्तूंचे तुम्ही काय कराल, ते सांगा.

प्र. ५. दोन-दोन उदाहरणे लिहा.

(१) मातीची भांडी-

(२) चामड्यापासून बनवलेली भांडी-

(३) लाकडी भांडी-

(४) तांब्याची भांडी-

(५) चिनी मातीची भांडी-

(६) नॉनस्टिकची भांडी-

(७) काचेची भांडी-

प्र. ६. यांना काय म्हणतात?

(अ) जेवणासाठी पंक्तीत वापरण्यात येणारे ताट.

(आ) जेवणापूर्वी व जेवणानंतर हात धुवायचे भांडे.

(इ) दुधासाठीचे भांडे.

(ई) ताकासाठीचे भांडे.

(उ) पूर्वी अंघोळीसाठी वापरायचे भांडे.

## खेळूया शब्दांशी.

- कंसातील शब्द व शब्दसमूह यांमध्ये योग्य बदल करून रिकाम्या जागा भरा.

(अविभाज्य अंग, नित्योपयोगी, विराजमान होणे, सगेसोयरे)

(अ) संत तुकारामांनी वृक्षांना ............. संबोधून त्यांचा गौरव केला.

(आ) ............. वस्तू जपून व व्यवस्थित ठेवाव्यात.

(इ) आज शाळेतील ज्येष्ठ शिक्षक मुख्याध्यापक पदावर ............. .

(ई) कुटुंब हे मानवी जीवनाचे ............. आहे.

**उपक्रम :**

तुमच्या घरातील सर्वांत जुन्या चार भांड्यांची चित्रे काढा व रंगवा.



## चर्चा करूया.

- अंघोळीचे पाणी तापवण्यासाठी बंब वापरण्याचे प्रमाण कमी झाले आहे.
- दैनंदिन जीवनात चांदीची भांडी वापरण्याचे प्रमाण नगण्य आहे.

## माहिती मिळवूया.



- ❖ पत्रावळी तयार करण्यासाठी कोणकोणत्या झाडांची पाने वापरतात?
- ❖ पत्रावळीची पाने एकमेकांना कशाच्या साहाय्याने जोडली जातात?
- ❖ पूर्वी वापरत असलेल्या व आता वापरत असलेल्या पत्रावळींमध्ये कोणते बदल झाले आहेत?



## माहीत आहे का तुम्हांला?

- खालील उतारा वाचा. त्यातील घटना क्रमाने सांगा.

### कल्हई म्हणजे काय?



स्वयंपाकघरातल्या जुन्या तांब्याच्या आणि पितळ्याच्या भांड्यांची जागा जशी स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांनी घेतली, तसतशी कल्हई आणि कल्हईवाले दुर्मिळ होत गेले. तांब्या, पितळ्याची भांडी चकचकीत करून त्यावर कथील धातूचा थर लावण्याचे काम हे कल्हईवाले करत. गल्लीगल्लीतून फिरून 'कल्हईवालाऽऽ' अशी आरोळी ठोकल्यानंतर एखाद्या झाडाखाली कल्हईवाला त्याचे दुकान थाटत असे.


तांब्याच्या भांड्यात आंबट किंवा आम्लधर्मी पदार्थ बनवले असता, त्यांच्यात रासायनिक प्रक्रिया होऊन अन्न बिघडण्याची शक्यता निर्माण होते. काही वेळेस अन्नाची चव बिघडते, तर काही वेळेस अन्नपदार्थांच्या रंगात बदल होतो. त्यातून विषबाधा होण्याचा धोका संभवतो. हे टाळावे म्हणून तांब्याच्या आणि पितळ्याच्या भांड्यांना आतून कल्हई केली जाते.

जमिनीत छोटा खड्डा खणून त्यात भट्टी तयार केली जाते. त्यातील विस्तवावर भांडे आतल्या बाजूने तापवले जाते. पांढऱ्या रंगाची नवसागराची (अमोनिअम क्लोराइड) भुकटी वापरून भांडे आतल्या बाजूने घासून स्वच्छ, लख्ख केले जाते. हे करताना पांढरा, उग्र वासाचा धूर तयार होतो. भांडे गार होण्यापूर्वीच कथील (टिन) धातूचा छोटा तुकडा भांड्यात टाकला जातो. कथील हा मऊ, लकाकणारा, निळसर-पांढऱ्या रंगाचा उपयुक्त धातू आहे. तो पटकन वितळतो. अतिशय कौशल्याने कल्हईवाला तो वितळलेला धातू पटकन भांड्यात सर्वत्र पसरवून त्याचा लेप देतो. भांडे थंड करण्यासाठी ते थंड पाण्यात टाकले जाते. कल्हई केलेल्या भांड्यात बनवलेले जेवण शरीरासाठी अपाय करत नाही, म्हणून दर काही महिन्यांनी तांब्या-पितळ्याच्या भांड्यांना कल्हई करणे गरजेचे असते.


**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून या पाठाचे सादरीकरण करून घ्यावे. तसेच वरील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घ्यावे. उताऱ्यातील कृती क्रमाने सांगण्याची सूचना द्यावी. घटनाक्रम सांगताना योग्य ते मार्गदर्शन करावे.

- वाक्यातील क्रिया केव्हा घडली, कोठे घडली, किती वेळा घडली, कशी घडली यांवरून क्रियाविशेषण अव्ययांचे चार मुख्य प्रकार पडतात.


## क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार



**पूर्वी** शिक्षक पगडी घालत असत.
– कालवाचक क्रियाविशेषण अव्यये
उदा., आधी, सध्या, हल्ली, सदा, उद्या, नित्य, वारंवार इत्यादी.



गोगलगाय **हळू** चालते.
– रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये
उदा., पटकन, पटपट, जलद, आपोआप इत्यादी.



**सभोवार** जंगल होते.
– स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये
उदा., सर्वत्र, इथे, जिथे, जिकडे, खाली, मागे, पलीकडे इत्यादी.



टोपलीत फुले **भरपूर** आहेत.
– परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये
उदा.,किंचित, काहीसा, दोनदा, अत्यंत, मोजके इत्यादी.

- खाली दिलेल्या शब्दांचे क्रियाविशेषण अव्ययांच्या प्रकारांनुसार वर्गीकरण करा.

तिथे, दररोज, क्षणोक्षणी, सावकाश, तिकडे, अतिशय, पूर्ण, परवा, जरा, मुळीच, कसे, वर, थोडा, सतत, झटकन.

कालवाचक क्रियाविशेषण अव्यये




स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये



रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये



परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये



## शब्दकोडे सोडवूया.

- खालील चौकोनांतील अक्षरांमध्ये क्रियाविशेषण अव्यये लपलेली आहेत. उभ्या, आडव्या व तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन क्रियाविशेषण अव्यये तयार करा व दिलेल्या जागेत लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ह | ळू | थो | डे | आ | रो |
| आ | ज | डा | मो | ज | के |
| ज | रा | सा | व | का | श |
| त | सा | जि | र | ल | ही |
| अ | ने | क | दा | चि | त |
| ति | क | डे | खा | ली | र |

# ६. थोरांची ओळख — डॉ. खानखोजे

भाग–२



महान क्रांतिकारक व आंतरराष्ट्रीय कृषितज्ज्ञ :
डॉ. पांडुरंग खानखोजे

गदर क्रांतीचे प्रणेते ते मेक्सिको शेतीतले जादूगार असा प्रवास करणाऱ्या डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे ऊर्फ भाऊ यांचं सारं आयुष्यच विस्मयकारी घटनांनी भरलेले आहे.

तात्या आजोबांच्या मांडीवर बसून लहानगे भाऊ सतत स्वातंत्र्यलढ्याविषयीच्या कथा ऐकत असत. भाऊ हे आजोबांचे तसेच आईचेही लाडके होते. भाऊ प्राथमिक शाळेत जाऊ लागले, तसे त्यांचे मित्रमंडळही वाढू लागले. भाऊ व त्यांच्या साऱ्या मित्रांची माडीवरच्या खोलीत बंद दाराआड बसून काहीतरी खलबतं चालायची. इंग्रजांना व त्यांच्या सैन्याला कसं पळवून लावता येईल, याचे डावपेच ते आखत असत. लहानपणापासूनच इंग्रज सरकारविरुद्धचा तीव्र असंतोष भाऊंच्या मनात होता. इंग्रजांना देशाबाहेर काढल्याशिवाय देशाची परिस्थिती सुधारणार नाही, म्हणून त्याविरुद्ध लढा द्यायचा, असं भाऊंनी मनोमन ठरवलं.

पुढे खेडोपाडी जिथे संधी मिळेल तिथे भाऊ स्वदेशी चळवळ, भारतीय इतिहास, भारतीय स्वातंत्र्य या विषयांवर भाषणं देत असत. स्वातंत्र्यासाठी कार्यरत असताना भाऊंनी शिक्षण योग्य प्रकारे पूर्ण करावं, लग्न करून संसार करावा, असं त्यांच्या वडिलांना वाटत होतं; परंतु भाऊंचं मन वळवण्यात वडिलांना यश आलं नाही.

स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग असणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या भेटीसाठी भाऊ पुण्याला गेले. तिथे त्यांच्या सहवासात ते राहू लागले. त्यांच्या सहवासात राहणं ही भाऊंना मोठी पर्वणीच वाटत असे. भाऊंना रणशास्त्र शिकावं असं वाटत होतं. टिळकांनीही त्याला अनुमती दर्शवली. इंग्रज सरकारच्या आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज अशा सैन्याशी टक्कर द्यायची असेल, तर परदेशी जाऊन आधुनिक लष्करी शिक्षण घ्यावं, असा टिळकांनी त्यांना सल्ला दिला. सन १९०६ साली लोकमान्य टिळकांच्या सांगण्यावरून त्यांनी मायदेश सोडला.

अमेरिकेतील 'सान् राफाएल' येथील लष्करी शिक्षण देणाऱ्या ॲकॅडेमीत भाऊ दाखल झाले. शिस्तपालन, अभ्यासातील प्रगती, सर्व प्रकारच्या कामांतील तत्परता, शरीरचापल्य पाहून ॲकॅडेमीतील शिक्षकवर्ग भाऊंवर खूश होता. लष्करी शिक्षण घेत असताना कोणतीही उणीव राहू नये, म्हणून ते प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. १९१० साली 'टमाल पेस

मिलिटरी ॲकॅडमी'चा डिप्लोमा त्यांना मिळाला.

भारतीय बहुजन समाज शेतकऱ्यांचा आहे. शेती सुधारण्यावरच त्यांची खरी उन्नती व आर्थिक स्वातंत्र्य अवलंबून आहे. कृषक व श्रमजीवी एकत्र आले, तर इंग्रजांना सहज देशातून घालवून देऊ शकतील असा त्यांना विश्वास होता. शेतीच्या निमित्तानं बहुजन समाजात क्रांतीचा प्रचार करता येईल, अशा विचारानं त्यांनी कृषिशास्त्र शिक्षण पूर्ण करायचं ठरवलं. वॉशिंग्टन स्टेट कृषि महाविद्यालयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी नाव नोंदवलं. १९१३ साली त्यांनी मास्टर ऑफ सायन्स (एम. एस.) ही पदवी मिळवली.

कृषिशिक्षण घेत असताना त्यांनी अमेरिकेत क्रांतिकेंद्रं काढली. गदर उठावाच्या आखणीत ते आघाडीवर होते. लाला हरदयाळ, पं. काशीराम, विष्णू गणेश पिंगळे, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, भूपेंद्रनाथ दत्त हे क्रांतिकारक त्यांचे सहकारी होते. सशस्त्र लढा संघटित करण्यासाठी त्यांनी जपान, अमेरिका, कॅनडा, इराण, मॉस्को, बर्लिन अशी भ्रमंती केली आणि अपार साहसे अंगावर घेतली.

कृषिशास्त्रात डॉक्टरेट प्राप्त केल्यानंतर मेक्सिको येथील सरकारी कृषी विद्यालयात त्यांची प्राध्यापकपदी नेमणूक झाली. त्यांच्या अध्यापनाचा लौकिकही वाढत होता. 'जमीन आणि पिके' या विषयात त्यांच्या शब्दाला मोल आलं. 'जेनेटिक्स' या विषयात त्यांचा दबदबा वाढला. राष्ट्रीय प्रदर्शनात मिळालेल्या प्रथम पुरस्कारामुळे त्यांचा लौकिक अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. अध्यापनाव्यतिरिक्तच्या वेळात त्यांनी त्यांच्या प्रयोगशाळेत आणि प्रयोगक्षेत्रात गव्हावर अभ्यास सुरू केला. त्या प्रयोगांतून त्यांनी गव्हाचे विविध वाण तयार केले. पावसाळ्यात नि उन्हाळ्यात येणाऱ्या गव्हाची संकरित जात, तांबेरा न पडणारी आणि बर्फालाही दाद न देणारी, विपुल उतारा देणारी जात, अत्यंत कमी पावसात भरपूर उतारा देणारी जात इत्यादी.

डॉ. खानखोजेंचा 'जेनेटिक्स' क्षेत्रातला अभ्यास, 'जमीन आणि पिके' याबाबतीतले प्रयोग, गव्हावरचे संशोधन इत्यादी लक्षात घेऊन मेक्सिकन सरकारच्या शेतीसुधार मंडळाने त्यांना आमंत्रण दिले. संपूर्ण मेक्सिकोचा अभ्यासदौरा करावा, सर्व ठिकाणच्या कृषिसंस्था, संशोधन केंद्रे पाहावी, शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडचणी, अनुभव, विचार समजून घ्यावे, सुधारणा सुचवाव्या या कामगिरीवर डॉ. खानखोजेंची नेमणूक झाली. त्यांच्या दौऱ्याची मेक्सिकन सरकारने व्यवस्था केली. या दौऱ्यानंतर



त्यांनी मेक्सिकन जनतेचे मुख्य अन्न असलेल्या मक्याची पैदास नि दर्जा वाढवण्याच्या दृष्टीने संशोधनाला सुरुवात केली. मेक्सिकोतील 'तेवो सिंतले' ही निरुपयोगी वनस्पती आणि मका यांचे संकरण करून त्यांनी 'तेवो-मका' ही मक्याची नवीन संकरित जात निर्माण केली. एकेका मक्याच्या ताटावर तीस-तीस कणसे नि ती डाळिंबाप्रमाणे संपूर्णपणे भरलेली. अमेरिकेत यशस्वी झालेले मक्यासंदर्भातील प्रयोग त्यांनी मेक्सिकोत राबवले, त्यामुळे मेक्सिकोत मक्याची लागवड आणि पैदास उत्तमरीत्या वाढली. मेक्सिकन सरकारने १९३० सालचा राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरणारा आणि संशोधनासाठी असणारा पुरस्कार देऊन डॉ. खानखोजेंचा गौरव केला.

गहू, मक्यानंतर त्यांनी तूर, चवळी यांचे विविध वाण तयार केले. सोया डाळीची लागवड करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. त्यांनी शेवग्यावरही संशोधन केले. शेवग्याचा पाला, मुळ्या, शेंगांतील बिया आणि त्या बियांपासून मिळणारे सुगंधी तेल यांचे महत्त्व विशद करणारी पुस्तिका प्रकाशित करून सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली.

अपार देशप्रेम असणारा एक क्रांतिकारक, शेतकऱ्यांविषयीची कळकळ असणारा एक कृषितज्ज्ञ म्हणजे डॉ. पांडुरंग खानखोजे होय.

***

संदर्भ : डॉ. खानखोजे
नाही चिरा ... - वीणा गवाणकर



## स्वाध्याय

**प्र. १. खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा.**

(अ) तात्या आजोबांच्या मांडीवर बसून भाऊ स्वातंत्र्यलढ्याविषयीच्या कथा ऐकत असत.

(आ) भाऊंचं मन वळवण्यात वडिलांना यश आलं.

(इ) लोकमान्य टिळकांनी भाऊंना परदेशी जाऊन शिकून परतण्याचा सल्ला दिला.

(ई) भाऊंनी गहू, मका, तूर आणि चवळी यांचे वाण तयार केले.

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

**भाऊ खेडोपाडी जाऊन या विषयांवर भाषणं देत.**

**प्र. ३. कंसातील योग्य पर्याय शोधून रिकाम्या जागा भरा.**

(अ) भाऊंनी मास्टर ऑफ सायन्स ही पदवी ·············· येथे प्राप्त केली.
(जपान/अमेरिका/मेक्सिको)

(आ) ·············· या विषयात भाऊंचा दबदबा वाढला.
(फिजिक्स/जेनेटिक्स/मॅथमॅटिक्स)

(इ) भाऊंनी ·············· या विषयात डॉक्टरेट मिळवली.
(वनस्पतिशास्त्र/प्राणिशास्त्र/कृषिशास्त्र)

**प्र. ४. मक्यापासून कोणकोणते पदार्थ तयार केले जातात, त्यांची यादी तयार करा.**



### चर्चा करूया.

- **'कृषिशास्त्रात झालेल्या विविध संशोधनांमुळे धान्याची विपुलता वाढली आहे', या विषयावर वर्गात चर्चा करा.**

### शोध घेऊया.



- **दूरदर्शन, वृत्तपत्रे, पुस्तके, आंतरजाल यांसारख्या विविध माध्यमांद्वारे तुम्हांला आवडणाऱ्या थोर व्यक्तींची माहिती मिळवा. त्या माहितीचे हस्तलिखित तयार करा.**

## तुम्ही काय कराल ?

- तुम्ही सहलीसाठी गडावर गेला आहात, तेथील परिसरात फिरताना तुम्हांला पाण्याच्या बाटल्या व कचरा दिसत आहे.



## वाचा.

आपण स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत. आपल्या देशाचा राज्यकारभार घटनेनुसार चालतो. भारतीय घटनेने सर्व भारतीयांना काही मूलभूत हक्क दिले आहेत. जसे, समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क. दैनंदिन जीवन जगत असताना मनुष्याला अनेक गोष्टींची आवश्यकता असते. आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्याला समाजातील विविध घटकांवर अवलंबून राहावे लागते. अनेक घटकांच्या खरेदीसाठी आपण बाजारात जातो. दुकानात जातो. मालाची वा वस्तूंची खरेदी करणाऱ्या व्यक्तीला ग्राहक म्हणतात, तर माल वा वस्तूंची विक्री करणाऱ्या व्यक्तीला विक्रेता म्हणतात हे आपल्याला ठाऊक आहे. काही प्रसंगी ग्राहक व विक्रेता यांच्यामध्ये विवाद होतात, त्यांच्या हितसंबंधांत बाधा वा दुरावा निर्माण होतो. या दोहोतले हितसंबंध चांगल्या प्रकारे राहावेत, ग्राहकांच्या हितसंबंधांचे रक्षण व्हावे, ग्राहकांसंबंधी विवाद मिटावेत व याच्याशी संबंधित अशा इतर गोष्टींसाठी '**ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६**' या नावाचा कायदा करण्यात आला.

आपण खरेदी करत असलेल्या मालावर, वस्तूवर वा वस्तूच्या पुडक्यावर लिहिलेल्या किमतीपेक्षा जास्त किंमत जर विक्रेता आपल्याकडून घेत असेल किंवा मागत असेल, तर त्याविरुद्ध आपण आवाज उठवू शकतो. कोणताही विक्रेता नागरिकांच्या जीवितास वा सुरक्षिततेस घातक ठरणारा माल, बनावट माल ग्राहकांस विकत असेल, तर आपण या कायद्याचा आधार घेऊ शकतो. तक्रार निवारण करून घेण्यासाठी प्रत्येक ग्राहकास योग्य त्या ग्राहकमंचाकडे जाण्याचा हक्क असतो.

- **खाली दिलेला तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | क्रियापद | क्रियाविशेषण | क्रियाविशेषणाचा प्रकार |
|---|---|---|---|
| (१) काल तो मुंबईला गेला. | | | |
| (२) तो भरभर जेवतो. | | | |
| (३) इथे शहाळी मिळतात. | | | |
| (४) मी तो धडा दोनदा वाचला. | | | |

- **खालील वाक्यांत कंसातील योग्य रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये लिहा.**

(ढसाढसा, सावकाश, टपटप, आपोआप)

(अ) माझ्या डोळ्यांतून············ आसवे गळू लागली.

(आ) मी आईच्या गळ्यात पडून ············ रडलो.

(इ) रात्र होताच सगळ्यांचे डोळे ············ मिटू लागतात.

(ई) पक्ष्याने आपले पंख ············ फडफडवले.

# ७. माझी मराठी




● ऐका. वाचा. म्हणा.

माझी भाषा माझी आई
अर्थ भावनांना देई,
तिच्या राहावे ऋणात
होऊ नये उतराई.

तिच्या एकेका शब्दाला
रत्न-कांचनाचे मोल,
कधी तप्त लोहापरी
कधी चांदणे शीतल.

रानवाऱ्याच्या गंधात
माझी मराठी भिजली,
लेऊनिया नाना बोली
माझी मराठी सजली.

माझ्या भाषेचे अमृत
प्राशेल तो भाग्यवंत,
तिचा नाही दुजाभाव
असो कोणताही पंथ.

माझ्या मराठी भाषेची
काय वर्णावी थोरवी,
दूर देशी ऐकू येते
माझ्या मराठीची ओवी.

**मृणालिनी कानिटकर-जोशी** (१९६९) : आकाशवाणी व दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमांचे लेखन. 'सीमंतिनी' हा कवितासंग्रह प्रसिद्ध.

मातृभाषेविषयी आपल्या मनात आपुलकी असते. आपल्या आईविषयी सर्वांना प्रेम असते, तसे प्रेम मराठी भाषेविषयी सर्वांना वाटते. आपल्या मराठी भाषेतील शब्दांचे महत्त्व, बोलींचे महत्त्व, मराठी भाषेची थोरवी प्रस्तुत कवितेतून व्यक्त केली आहे.

## स्वाध्याय




**प्र. १. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) कवयित्रीचे मराठी भाषेशी नाते– ____________

(आ) खरा भाग्यवंत– ____________

(इ) (ई)




**प्र. २. खाली दिलेल्या अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) मराठी भाषा दूरवर पसरली आहे.

(आ) माझ्या मराठीची ओवी दूर देशांतही ऐकायला मिळते.

**प्र. ३. खालील कवितेच्या ओळींतील भाव तुमच्या शब्दांत लिहा.**

माझी भाषा माझी आई अर्थ भावनांना देई,
तिच्या राहावे ऋणात होऊ नये उतराई.

**प्र. ४. खालील शब्दांचा उपयोग करून तुमच्या मनाने वाक्ये तयार करा.**

(१) ऋण (२) थोरवी (३) उतराई (४) भाषा



## चर्चा करूया.

- **जागतिक मराठी राजभाषा दिनाचे तुमच्या शाळेत आयोजन करायचे आहे. त्यासाठी तुम्ही कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन कराल, त्याची यादी तयार करा.**

## खेळूया शब्दांशी.

- **कवितेतील शेवट समान असणारे शब्द लिहा.**

(१) मोल (२) भिजली (३) थोरवी

## कल्पक होऊया.

- खाली दिलेल्या भेटकार्डावर तुमच्या आवडत्या मित्र/मैत्रिणीच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा संदेश तयार करा.



प्रिय.....................

- खालील तक्त्यात तुमच्या आवडत्या सणांची नावे लिहून त्यानिमित्ताने तुमच्या मित्र/मैत्रिणीसाठी शुभेच्छा संदेश तयार करा व लिहा.

| सण | संदेश |
|---|---|
| गुढीपाडवा | स्वागत नववर्षाचे, आशा-आकांक्षांचे, सुखसमृद्धीचे, पडता दारी पाऊल गुढीचे! |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या प्रसंगांच्या निमित्ताने भेटकार्डे तयार करून घ्यावीत. प्रसंगानुरूप शुभेच्छा संदेश तयार करून घ्यावेत.

# ८. गचकअंधारी

**अशोक मानकर** (१९५९) : ग्रामीण विनोदी कथालेखक. ‘हेंबाळपंथी’, ‘हुनेर’, ‘गणपत फॅमिली इन न्यूयॉर्क’, ‘गचकअंधारी’ हे कथासंग्रह प्रसिद्ध. चित्रपट, दूरदर्शन मालिका, माहितीपट यांसाठी कथा व संवादलेखन.

सदाचा मुलगा गजानन सदाबरोबर बाजारात जाण्यासाठी सतत पाठीमागे लागायचा. एके दिवशी सदा त्याला घाबरवण्यासाठी गचकअंधारी नावाच्या एका काल्पनिक जनावराची भीती त्याला दाखवतो. पावसाच्या तडाख्यातून वाचण्यासाठी गावात आलेला वाघ व बाजाराला निघालेला सदा यांच्यात ज्या घटना घडतात, त्या विनोदी व मार्मिक शैलीतून लेखकाने मांडल्या आहेत.

**माहिती मिळवा.**

- मराठी साहित्यातील विनोदी लेखन करणारे लेखक व त्यांचे साहित्य (पुस्तके) याची माहिती लिहा.

| लेखक | पुस्तकांची नावे |
|---|---|
| चिं. वि. जोशी | |
| पु. ल. देशपांडे | |
| द. मा. मिरासदार | |

एका गावात सदा व सखू नावाचे जोडपे राहत होते. त्यांना गजानन नावाचा मुलगा होता. त्यांचा गाडगी, मडकी करण्याचा धंदा होता. भाजलेली मडकी सदा पंचक्रोशीतील गावांतल्या बाजारात विकायला नेई. गाढवाच्या पाठीवर मडकी ठेवून ते हाकत हाकत तो बाजाराला जायचा आणि येताना त्याच्या पाठीवर बसून यायचा. कधीकधी एखाद्या बाजारात मडकी शिल्लक राहत असत. ती तो कुण्या ओळखीच्या घरी ठेवायचा.

सदाचे व्यवस्थित चालले होते. आठवड्यातून दोन-तीनदा आपले वडील कुठेतरी बाजाराला जातात, हे लहानग्या गजाननला कळू लागले होते. वडिलांबरोबर बाजारात जाण्यासाठी आता तो सारखाच हट्ट करू लागला होता. दरवेळी त्याची समजूत घालता घालता सदा व सखू मेटाकुटीला येत असत.

एके दिवशी सदाला मडकी विकायला शेजारच्या गावात जायचे होते. भल्या पहाटे उठून सखूने भाकरी थापल्या. शिदोरी बांधून दिली. त्या वेळी गज्या गाढ झोपला होता. सदाला ज्या बाजाराला जायचे होते तिथे मागची मडकी शिल्लक होती. त्याने ती ओळखीच्या घरी ठेवली होती. त्यामुळे त्याला फक्त गाढवावर बसून जायचे होते. त्याने गाढव रात्रीच गावात चरायला सोडले होते. ते शोधले आणि त्यावर बसले, की परस्पर निघायचे या बेताने सदाने आवरले. अंगणातल्या चपला पायांत सरकवल्या. तो बाहेर पडणार, तोच गज्याला नेमकी जाग आली.

खाटेवरून धाडकन उडी घेऊन पळतच बापाजवळ येत त्याने गिल्ला केला, ‘‘मी येतो, मी येतो.’’ सदाने डोक्याला हात लावला.



रात्री सदाच्या गावालगतच्या परिसरात जोराचा वादळी पाऊस झाला होता. विजा कडाडल्या होत्या. गारपीट झाली होती आणि त्या तडाख्यात एक वाघ सापडला होता. वाघाने बावचळून आपल्या जागेवरून पळ काढला होता. आसरा शोधत तो सदाच्या गावात येऊन धडकला होता. पहाटेपर्यंत कुठेतरी आश्रय घेऊ नि झुंजूमुंजू होताच इथून निघून जाऊ, या हिशेबाने वाघाने गावात जागा शोधण्याचा प्रयत्न केला. इकडे शोध, तिकडे शोध करत त्याला एक पडके खिंडार दिसले. आत जाऊन वाघ बाजूच्या भिंतीलगत उभा राहिला. ही सदाच्या घराची मागची भिंत होती.

साहजिकच खिंडारात भिंतीशी उभ्या असलेल्या वाघाला सदाच्या घरातले बोलणे स्पष्ट ऐकू येत होते.

सदा विचार करत म्हणाला, ''बाबू, तुले म्या नेलं असतं, पन अंधार किती हाय. रातच हाय ना अजून.''

गज्या उसळला, ''असू द्या. मी येतो, मी येतो.''

''लेका, रस्त्यावर या वक्ती कोला असते बरं.''

''असू द्याऽऽ.''

''लाहान लेकराले उचलून नेते म्हंतात तो.''

''निऊ द्या. कै नै, मी येतो... येतो...''

''तिकळे लांडगा येते मंग.''

''यिऊ द्या. मी येतो. येतो म्हंजे येतोऽऽ.''

''पुळे जंगल लागते. जंगलात वाघ असते या टैमाले.''

''हूं ! असू द्या. कै भेव नोका दाखू मले वाघा–फाघाचा.''

ते ऐकून वाघ मनाशी म्हणाला, 'लोयच आटेल पोट्टं दिसून रायलं इचिन.'

''अन् वाघानं खाल्लं त तुले?'' सदानं म्हटलं. तसा गज्या तोंड वेडावत म्हणाला, ''मले खाल्लं त तो काय तुमाले सोळनार हाये काय? कै नै मले मैत हाये. मी यिऊ नोय म्हनून तुमी मले भेव दाखून रायले.''

सदाने विचार केला. डोळे मोठे करून म्हणाला, ''या वक्ती जंगलात कदी ना ते गचकअंधारी भेटली त म्हनू नोको मले.''

गज्या गडबडला, ''गचकअंधारी?''

''हौ, गचकअंधारी.''

''काय होय हे गचकअंधारी?''

''गचकअंधारी मैत नै तुले? लेका, गचकअंधारी वाघासिंव्हालेई एका घासात खाते म्हंतात. आपल्याले भेटली त? कै नै भौ, एवळं खतरनाक जनवार तरी हाये काय कोंतं?''

''खतरनाक?'' आता गज्या हादरला. शहारून आईजवळ पळाला अन् म्हणाला, ''मी नै येत मंग. जा तुमीच.''

सदाची युक्ती फळाला आली.

वाघ मनातून भ्याला. 'कोंती गचकअंधारी होय बावा! आपल्याले भेटली त? कै नै भौ, थोळसंक दिसाले लागल्यावर चाल्ले जाऊ अथून.'

सदा लगबगीने घराबाहेर पडला. रात्री चरायला सोडलेले गाढव शोधू लागला. अद्याप गुडूप अंधार होता. ही गल्ली बघ, हा उकिरडा बघ, तो बघ, असे सगळीकडे फिरत अखेरीस त्याच्या घरामागच्या खिंडाराजवळ आला.

भिंतीशी वाघ उभा होता. दुरून त्याची अस्पष्टशी आकृती दिसताच सदा स्वत:शी उद्गारला, 'हाये सायाचं. मी साऱ्या गावात पाहून रायलो अन् हे गधळं पायलं त अथी उभं.'

सदा तरातरा चालत आला. गच्चकन वाघाचा कान पकडला आणि टांग फेकून टपकन त्याच्या पाठीवर बसला.

वाघ प्रचंड हादरला. 'बापरे! हे गचकअंधारी हाय!' असं स्वत:शी म्हणताना त्याला हिव भरलं.

सदानं रपदिशी पायांच्या टाचा त्याच्या पोटावर हाणल्या. घाबरलेला वाघ आपल्या पाठीवरचा स्वार घेऊन निमूट चालता झाला.

वाघाची चालण्याची गती पाहून सदाने विचार केला– 'लोय जोऱ्यानं चालून रायलं गधळं. बरोबर हाये, राती सट खाल्लं वाट्टे यानं. चाल म्हना लेका. मलेई बरंच हाये. तिकळे गज्या भेला. आता अटालाच नै रायला. आता काय, मस्त बाजारात जानं अन् भदाळं इकनं.'

स्वारीने गाव ओलांडले. जंगलचा रस्ता धरला.

अजून किट्ट काळोखच होता; पण आकाशात चांदण्या लुकलुकत होत्या. पहाटेची थंडगार हवा सुटली होती. हवेच्या झुळका सदाला मोरपिसाच्या स्पर्शासारख्या वाटत होत्या आणि इकडे वाघाचा धावा सुरू होता, 'हे देवा, दया कर...मले वाचो. माल्या पाठीवरची ही बला जाऊ दे.'

पूर्वेला प्रभा फाकण्याच्या बेतात आली. मान डोलावत इकडे तिकडे पाहताना सदाचे लक्ष वाघाच्या पाठीवर गेले. गाढवाचा राखाडी सोडून पिवळा रंग आणि त्यावर काळे पट्टे दिसताच त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. 'हे कसं काय?' असे म्हणत सदाने मान थोडी कलती केली आणि पाहतो तर काय? साक्षात वाघ ! त्याला कापरे भरले. तो थाड्थाड् उडू लागला. या छेडछाडीने वाघ सदाच्या दुप्पट हलू लागला. मनाशी म्हणू लागला, 'गचकअंधारी झटके देऊन रायली, म्हंजे आपल्याले खायाची तयारी करून रायली हे.'



सदा आकाशाकडे पाहत करुणा भाकू लागला, 'हे इस्वरा, काय बुद्धी देली बावा. गधं सोळून वाघाच्या पाठीवर बसलो अन् हा वाघई मले घिऊन चाल्ला .... पन मी याले दिसलो त?... त हा माही नळ्ली फोळ्ल्याशिवाय राह्यत नै... मले वाचो याच्यातून... या संकटातून तार.'

सदाला दरदरून घाम फुटला. एवढ्या थंड वातावरणातही घामाने तो वरपासून खालपर्यंत थबथबला. डोक्यापासून घामाच्या धारा ओघळू लागल्या. घाम वाघाच्या पाठीवर उतरू लागला, तेव्हा वाघाची घाबरगुंडी उडाली. 'घेऽवो. आता त गचकअंधारी पानी सोळून रायली, म्हंजे मले हे आता पान्यात भिजू भिजू खाते.' ह्या विचाराने वाघाचे काळीज जोरजोरात धडधडू लागले.

कापरे भरलेला सदा सुटकेचा काही मार्ग सापडतो का म्हणून इकडे तिकडे पाहू लागला. दूरवर त्याला वडाचे झाड दिसले. त्याच्या पारंब्या जमिनीपर्यंत आलेल्या होत्या आणि हा रस्ता वडाच्या झाडाखालून जात होता. सदाच्या जिवात जीव आला. वाघ जेव्हा झाडाखालून जाऊ लागला, तेव्हा सदाने विलक्षण चपळाई केली. लोंबणारी पारंबी पकडत तो वाघाच्या पाठीवरून सटकला आणि सरसर वर गेला.

सदा असा अलगत वेगळा होताच, 'जमलं बाबा ! सुटलो. नाहीतर गचकअंधारी आज आपल्याले खाल्ल्याबिगर राहत नव्हती. धन्य रे बाबा तुही', असे म्हणत वाघ सुसाट पळत सुटला !

***

## स्वाध्याय

**प्र. १. खालील वाक्ये वाचा. प्रत्येक घटनेमागील तुम्हांला जाणवलेली कारणे लिहा.**

(अ) सदा मडकी विकून येताना गाढवाच्या पाठीवर बसून येत असे.

(आ) गज्याने वडिलांसोबत जाण्याचे नाकारले.

(इ) वाघ सदाच्या दुप्पट हलू लागला.

(ई) सदा आकाशाकडे पाहत करुणा भाकू लागला.

**प्र. २. खालील मुद्द्यांवर दोन-तीन वाक्यांत माहिती लिहा.**

सदाचा व्यवसाय → सदाचा मुलगा गजानन → सदाची झालेली फजिती → सदाने स्वत:ची केलेली सोडवणूक

**प्र. ३. कोण, कोणास व का म्हणाले?**

(अ) ''कै भेव नोका दाखू मले वाघाफाघाचा.''

(आ) ''या वक्ती जंगलात कदी ना ते गचकअंधारी भेटली त म्हनू नोको मले.''


(इ) 'गचकअंधारी झटके देऊन रायली.'

(ई) 'गचकअंधारी आज आपल्याले खाल्ल्याबिगर राहत नव्हती.'

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचार अभ्यासा.**

'भीती वाटणे' हा खालील वाक्प्रचारांचा अर्थ आहे.




एकाच अर्थाचे इतके वाक्प्रचार असणे, हे मराठी भाषेच्या समृद्धीचे लक्षण आहे. याप्रमाणे एकाच अर्थाच्या अनेक वाक्प्रचारांचा संग्रह करा.

**(आ) आपल्या आजूबाजूच्या चार–पाच कोसांच्या आतील गावांना, खेड्यांना मिळून 'पंचक्रोशी' म्हणतात. यामप्रमाणे खालील शब्दसमूहांबद्दल प्रत्येकी एक शब्द लिहा.**

(अ) ज्यास कोणी शत्रू नाही, असा.
(आ) मोफत पाणी मिळण्याचे ठिकाण.
(इ) धान्य साठवण्याची जागा.
(ई) दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा.
(उ) डोंगर पोखरून आरपार केलेला रस्ता.

**(इ) खालील चौकोनात विशेष्य व विशेषणे एकत्रित दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

काळोख, विलक्षण, पारंबी, पाऊस, वादळी, लोंबणारी, चपळाई, किट्ट.

| विशेष्य | विशेषण |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

**(ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांच्या रूपात योग्य बदल करून वाक्ये पूर्ण करा.**

(मेटाकुटीला येणे, गिल्ला करणे, सुसाट पळत सुटणे, शंकेची पाल चुकचुकणे.)

(अ) पतंग पकडण्यासाठी धडपडणाऱ्या मुलांनी एकच.................... .
(आ) उघड्या भांड्यातील पाणी पाहून अबोलीच्या मनात .................... .
(इ) लहान मुलांची मस्ती बघून आईचा जीव.................... .
(ई) पोलिसांना बघून चोर.................... .



**विचार करा. सांगा.**

- **हा पाठ वाचताना तुम्ही खूप हसलात, असे पाठातील विनोदी प्रसंग सांगा.**
- **'गचकअंधारी' हे पाठातील पात्र काल्पनिक आहे की खरे, याबाबत तुमचे मत लिहा.**
- **पाठाच्या दृष्टीने 'गचकअंधारी' या पात्राचे महत्त्व स्पष्ट करा.**



**माझे वाचन.**

मराठी साहित्यात विनोदी लेखन करणाऱ्या लेखकांची शिक्षक व पालक यांच्याकडून माहिती घ्या. विनोदी लेखन करणाऱ्या लेखकाचे एखादे पुस्तक वाचा. त्यातील एखादी गोष्ट वर्गात सादर करा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील परिच्छेद वाचा.**

शाळा सुटताच मुले शाळेबाहेर आली. शाळेच्या फाटकासमोर काही मुलांचे पालक उभे होते. रस्त्यावर वाहनांची गर्दी होती. मुलांसाठी वाहने थांबली. मुलांनी रस्ता ओलांडला.

वरील अधोरेखित शब्द स्वतंत्र नाहीत. -बाहेर, -समोर, -वर, -साठी हे शब्द अनुक्रमे शाळा, फाटक, रस्ता, मुले या शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती **शब्दयोगी अव्यये** आहेत. -पूर्वी, -पुढे, -आधी, -नंतर, -पर्यंत, -आत, -बाहेर, -मागे, -मुळे, -शिवाय हीदेखील शब्दयोगी अव्यये आहेत.

अनेक क्रियाविशेषणे शब्दयोगी अव्यये म्हणून वापरली जातात. अशा वेळी ती प्रत्ययांप्रमाणे शब्दांना जोडूनच लिहायची असतात.

ही दोन वाक्ये पहा.

(१) तो पूर्वी सैन्यात होता. 'पूर्वी'- क्रियाविशेषण अव्यय

(२) जेवणापूर्वी हात धुवावेत. '-पूर्वी' शब्दयोगी अव्यय

पूर्वी आपण प्रत्यय जोडण्यापूर्वी नामांचे, सर्वनामांचे सामान्यरूप होते, हे पाहिले. शब्दयोगी अव्यये जोडण्यापूर्वीही नामांचे, सर्वनामांचे सामान्यरूप होते.

वरील परिच्छेदात शाळे-, मुलां-, रस्त्या-, वाहनां- हे सामान्यरूप झालेले शब्द आहेत.

- **खालील परिच्छेद वाचा. त्यातील शब्दयोगी अव्यये अधोरेखित करा.**

आमच्या शाळेसमोर वडाचे झाड आहे. झाडाभोवती भक्कम पार बांधला आहे. त्या पारावर बसून आम्ही डबा खातो. झाडाखाली खेळतो. शाळेची घंटा होईपर्यंत झाडाजवळ मुलांची गर्दी असते. हे वडाचे झाड शाळेच्या पहिल्या दिवसापासून मला एखाद्या मित्राप्रमाणे वाटते.

## भाषेची गंमत

भाषेचा वापर करत असताना व लिहिताना आपण नैसर्गिकरीत्या थांबतो. आपण आजूबाजूला वावरत असताना, प्रवास करत असताना अनेक पाट्या वाचतो. त्यावर काही सूचना दिलेल्या दिसतात. बऱ्याचवेळा काही शब्द योग्य ठिकाणी न जोडल्यास किंवा न तोडल्यास वाक्याचा अर्थ बदलून जातो व त्यातून गंमत निर्माण होते.

उदा., (१) इथे वाहन लावू नये.
इथे वाहन लावून ये.
(२) हिरवळीवर कचरा टाकू नये.
हिरवळीवर कचरा टाकून ये.

या प्रकारची तुमच्या वाचनात आलेली वाक्ये लिहा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना शब्दयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

# ९. नात्याबाहेरचं नातं

**सुभाष किन्होळकर** (१९७०) : 'मशाल', 'रानमेवा' हे काव्यसंग्रह; 'ट्रिंग ट्रिंग', 'हसत-खेळत' हे बालकवितासंग्रह; 'झळ' ही कादंबरी; 'गगनगंध' हा ललितलेखसंग्रह प्रसिद्ध.

लेखक थंडीच्या तडाख्यात सापडलेल्या कुत्र्याच्या गोंडस पिलाला घरी घेऊन येतात. त्याला पाळतात. 'डांग्या' नावाच्या या कुत्र्याच्या स्वभावातील स्वामिभक्ती, रुबाबदार दिसणे, वागण्यातील ऐट व त्याचा कुटुंबाला लागलेला लळा इत्यादी गोष्टी प्रस्तुत पाठात लेखकांनी रोचक व वेधक प्रसंगांतून शब्दबद्ध केल्या आहेत.

**तुम्ही काय कराल?**

- एका कुत्र्याच्या पिल्लाच्या पायाला इजा झाली आहे, अशा प्रसंगी तुम्ही काय कराल?
- तुमच्या घराच्या बाहेरील बाजूस चिमणी घरटे बांधत आहे.

थंडीचा हळवा झंकार सर्वांगाला वेढून टाकणारा. रान, पानाफुलांना आपल्या इशाऱ्यावर नाचवणारा. नदीच्या झुळझुळणाऱ्या पाण्याला मंद लहरींवर खेळवणारा. आकाश स्वच्छ. पुनवेच्या रेखीव छटांनी तर रात्रीचं अंतरंगच उजळून निघालेलं. जिकडे तिकडे लख्ख झगमगाट पसरलेला. रात्र काहीशी सामसूम; पण मन वेल्हाळ.

रात्र जशीजशी आगेकूच करू लागलेली तशी थंडीची लाटही वाढलेली. सारी थरथरती लाट मफलर, कानटोपी आणि स्वेटरमध्ये बंदिस्त झालेली. अशा कडाडत्या थंडीतही गावगल्लीची वाट सरळ गावाबाहेर घेऊन गेलेली. तिथं चार-सहा जणांचा घोळका शेकोटी पेटवून असलेला. शेकोटीभोवती मक्याच्या कणसांचा भुसा पडलेला. चार-दोन गवऱ्याही त्याच्या बाजूला आपल्या अस्तित्वाची चाहूल देत असलेल्या. शुभ्र चांदण्यांच्या प्रकाशकिरणांत त्यांच्या चाललेल्या भेंड्यांना रंग चढलेला. माझाही त्यांच्यातील सहभाग आनंदाची वृद्धी करणारा. शेकोटीपासून दहा-पंधरा पावलांच्या अंतरावर असलेलं एक कडूलिंबाचं झाड चांदण्यांच्या लख्ख प्रकाशात अधिकच प्रसन्न दिसत होतं. वाऱ्याच्या झोतात हलणारी त्याची डहाळी मन आकर्षित करणारी. सारं भावस्पंदनावर झंकार उठवणारं. अशा चित्तवेधक झाडाच्या बुंध्याशी नजर वळताच आश्चर्याचा धक्का बसून गेलेला. कसली वळवळ म्हणावी? कोण असावं?

नकळत माझी पावलं बुंध्याच्या दिशेनं वळली. सोबतीला मित्रही. सर्वांनाच उत्सुकता लागलेली. काय असावं बरं तिथं एवढ्या कडक थंडीत! पाहतो तर काय... एक लहानसं कुत्र्याचं पिल्लू. अंगाचं गाठोडं करून पडलेलं. समोरच्या दोन्ही पायांत मान खुपसलेली. हुडहुडी रोखण्याचा त्याचा चाललेला प्रयत्न आम्हांला सुन्न करून गेला. थंडीच्या ओलसरपणानं त्याच्या केसांवर जणू कुणी पाणीच शिंपडलंय की काय असा भास झालेला. इवल्याशा जिवाला तशी थंडी असह्यच.

रात्रीचा दहा-साडेदहाचा सुमार. गाव तसं शांतच. अशा शांत वातावरणात त्या इवल्याशा पिल्लाची तीक्ष्ण नजर आमच्यावर खिळली. काय शोधत असावं ते पिल्लू आमच्यात? आधार तर मागत नसावं! अगदी आधारच, म्हणूनच तर त्याचं नखशिखान्त न्याहाळणं चाललेलं. आमच्याकडे वळलेली त्याची दृष्टी त्याच्या सगळ्या वेदनांना डोहात टाकणारी. अधूनमधून त्याचं चाललेलं कण्हणं, विराम शांततेचा भंग करणारं. त्याच्याविषयी सगळ्यांच्या मनात कणव निर्माण झाली. त्यानं उठण्याचा प्रयत्न केला, पण पाय बधिर झालेले.

त्या पिल्लाची धडपड पाहून माझी पावलं नकळत त्याच्या दिशेनं खेचली गेली. मला येताना पाहून त्याला एकदम हायसं वाटलं. आधार देण्यासाठी कुणीतरी

धावून आल्याची त्याला जाणीव झाली. पाय उचलून त्यानं माझं स्वागत करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. माझ्या हाताचा त्याला स्पर्श होताच त्याच्या डोळ्यांत लख्ख प्रकाश जाणवला. त्याला अतिशय सुखावल्यासारखं वाटलं. का, कशी, पण त्याच्याविषयी माझ्या मनात स्नेहभावना उमलली. त्याचं अंग थरथरू लागलं. त्याची हुडहुडी रोखण्यासाठी मी माझ्या गळ्यातला मफलर त्याच्या अंगावर टाकला. मफलरमुळे काहीशी ऊब मिळाल्यानं त्याचा चेहरा अधिकच खुलला. हुडहुडीही थांबली.

दिलं तर त्यानं कोठे जावं ? कोण देईल त्याला आधार ? कोण लळा लावील ? असे कितीतरी प्रश्न मनात घिरट्या घालून गेले; पण त्याला असं अर्ध्यावर सोडून देणं अशक्य. पुन्हा बाबांचा मुक्या शब्दांचा मार निमूटपणे सोसला.

पिल्लू दिसायला कापसासारखं. तेजस्वी डोळे, मऊ कान, लांबट नाक. त्याला पाहताच प्रेम जडावं इतकं आकर्षक. त्याला हवा असलेला माझा आधार अगदी पक्का, म्हणून रात्रभर त्याला अंथरुणापाशी झोपवलं. माझ्या अंगावरील ब्लँकेटच्या उबेमुळे त्याला



लहानग्या गोंडस पिल्लाला हवा असलेला आधार मिळाला. त्याला अतिशय खुशी झाल्याचं जाणवलं. त्याच्या चोरट्या नजरेनं त्यानं मला पुन्हा न्याहाळलं. मलाही त्याच्याविषयी आपुलकी निर्माण झाली. त्याला कायमचा आधार मिळावा म्हणून मी त्याला थेट माझ्या घरी घेऊन आलो. घरात माझा प्रवेश होताच घरातली मंडळी एकदम बावरली. 'टाक ते पिल्लू खाली, टाक म्हणतो ना !' बाबांनी चांगलंच फटकारलं; पण मनात त्या पिल्लाविषयी रुखरूख. आपण पिल्लाला सोडून

थंडीपासून संरक्षण मिळालं. एक मित्र मिळाल्याचं समाधान त्याच्याही आणि माझ्याही चेहऱ्यावर झळकू लागलं. ध्यानीमनी नसताना जुळून आलेलं नातं अगदी सुखावून गेलं. त्याला आता प्रेमाची ऊब मिळाली, त्यामुळे त्याचं कण्हणंही थांबलं. शांत झोपही लागली. चिंबओल्या स्वप्नांचा फुलोर दोघांच्याही स्वप्नात बहरून आला.

सकाळच्या प्रसन्न हळदुल्या किरणांना साक्ष ठेवून त्याचा नामकरण सोहळा क्षणभरात आटोपला गेला.

त्याच्या दांडग्या शरीराला अनुरूप असं त्याचं 'डांग्या' नाव ठेवलं. मित्रमंडळींनाही त्याचं नाव आवडलं. आता तोही सगळ्यांचा खास मित्रच बनला. प्रत्येकाला त्याचा लळा लागला. त्याची दुडुदुडु चाल भावणारीच. त्याचे तेजस्वी डोळे अगदी बोलके. त्याच्या मनातील गोष्टीला जणू उजाळा देणारे. अंगावर पडणारी त्याची झेप उत्साह द्‌विगुणित करणारी.

डांग्या लहानाचा मोठा होऊ लागला. वाढत्या वयासोबत त्याचा चेहरा अधिक प्रसन्न, शरीरयष्टी अधिक दणकट. त्याचं तरणंबांड शरीर येणाऱ्या-जाणाऱ्याच्या नजरेला भुरळ घालणारं. दोन्ही डोळ्यांच्या खाली असलेले पिवळसर पट्टे आणि मागच्या पायांच्या बोटांवर असलेले लालसोनेरी पट्टे सगळ्यांचं लक्ष आकर्षित करणारे.

डांग्याचं ओट्यावर पाय पसरून बसणं, रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांच्या डोळ्यांना मोहून टाकणारं. दूरवरून आलेली मित्रमंडळींची शीळ तर त्याची जणू पाठच झालेली. शिळेच्या रोखानं त्याचं दुडदुडणं लक्षवेधक. साऱ्या गावाला भुरळ घातलेली. त्याचं सोज्वळ रूप पाहून आईबाबांनासुद्‌धा त्याचा नकळत लळा लागून गेला. डांग्यालाही त्यांच्याविषयी खूप जिव्हाळा. त्यानं जणू त्यांच्या थेट हृदयातच प्रवेश केला.

त्याच्या नावाची कीर्ती सर्वदूर पसरली. प्रत्येकाच्या डोळ्यांत त्याचं रूप नटलं. डांग्या अतिशय प्रामाणिक. घरादारात, शेतातसुद्‌धा त्याचा प्रामाणिकपणा जाणवलेला. शेतातील त्याची रखवाली अट्टल चोराची दातखिळी बसवणारी. डांग्याच्या नुसत्या कर्तबगारीनं भल्याभल्यांची बोबडी वळायची. पक्क्या हिमतीचा राखण्या मिळाला, म्हणून त्याच्या नावानं मनात घर केलेलं, जे कधीही विसरता येणार नाही. रात्रीची त्याची राखणदारी उभार डोळे तेवत ठेवणारी.

त्याची भारदस्त छाती पाहून झाडांवरील माकडांची अक्षरश: घाबरगुंडी उडायची. डांग्याचं नुसतं झाडाखाली बसून राहणंही माकडांच्या काळजात धस्स करणारं. एवढंच नव्हे, तर त्याच्या भीतीनं खारूताईसुद्‌धा पळायची. डांग्या असेपर्यंत तिलाही उपवास. इतर प्राण्यांनासुद्‌धा भीती वाटावी, असंच त्याचं शरीर अगडबंब.

कोण कशासाठी शेतात आला, याचा अंदाज समोरच्या व्यक्तीच्या डोळ्यांतून त्याला सहज आलेला असायचा. त्याची हुशारी, चपळता अगदी वाखाणण्याजोगी. एखाद्या वेळी माझी अनुपस्थिती कुणालाही न कळणारी, एवढी छाप डांग्यानं पाडलेली. विश्वस्तच म्हणावा त्याला. त्याच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वानं थेट माझ्या हृदयात शिरकाव केला. एक सच्चा दोस्त मिळाल्याचं समाधान डोळ्यात झळकलेलं.

दूरवरून घुमवलेली शीळ डांग्याच्या कानावर पडली; की मागच्या दोन्ही पायांवर उभा राहून माझ्या येण्याची चाहूल घ्यायचा. मान उंचावून ओळखीचं रूप न्याहाळायचा. कानांची उघडझाप करून पुन्हा दुसऱ्या शिळेचा कानोसा घ्यायचा. एखाद्या पाहुण्याच्या स्वागतासाठी जसं आपण पुढे जाऊन स्मितहास्य करतो, तसाच तोही माझ्या स्वागतासाठी दुडदुडत यायचा. अंगावर झेप घ्यायचा. त्याच्या तोंडानं हात चाटायचा. किती प्रेम एका प्राण्याकडून ! ना नात्याचा, ना गोत्याचा. केवळ एक अनवधानानं, वेळप्रसंगानं घडून आलेलं नातं अविस्मरणीय होऊन गेलं.

***

http://essaynnotes.cjkwebgroup.com

https://simple.wikipedia.org/wiki/Dog

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पाठाचे मूकवाचन करून घ्यावे. पाठातील एखाद्या परिच्छेदाचे अनुलेखन तसेच श्रुतलेखन करून घ्यावे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील विधानांमागील कारणे लिहा.**

(अ) लेखकांनी कुत्र्याच्या पिल्लाला थेट घरी आणले.
(आ) लेखकांनी कुत्र्याच्या पिल्लाचे नाव 'डांग्या' ठेवले.
(इ) लेखक डांग्याला 'पक्क्या हिमतीचा राखण्या' म्हणतात.

**प्र. २. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) थंडीच्या झंकाराची वैशिष्ट्ये.

(इ) खालील बाबतींत डांग्याचे वर्णन करा.
दिसणे | शरीरयष्टी | चाल | नजर

(आ) कुत्र्याच्या पिल्लाला थंडी असह्य झाली, हे वर्णन करणारी पाठातील वाक्ये.

**प्र. ३. खालील घटनांचे काय परिणाम झाले ते लिहा.**

| घटना | परिणाम |
|---|---|
| (१) लेखकांनी पिल्लाच्या अंगावर मफलर टाकला. | |
| (२) कुत्र्याचं पिल्लू रात्रभर लेखकांच्या अंथरुणापाशी झोपलं. | |
| (३) झाडांवरील माकडांची घाबरगुंडी उडायची. | |
| (४) लेखकांच्या मित्रमंडळींनी दूरवरून घुमवलेली शीळ डांग्याच्या कानावर पडली. | |

**प्र. ४. योग्य जोड्या लावा.**


| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) पिल्लाची धडपड पाहून | (अ) थंडी असह्य होत होती. |
| (२) रात्र आगेकूच करू लागली | (आ) मन आकर्षित करत होती. |
| (३) वाऱ्याने हलणारी डहाळी | (इ) थंडीची लाट वाढली. |
| (४) इवल्याशा जिवाला | (ई) पावलं नकळत त्याच्याकडे खेचली गेली. |

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे तुम्हांला समजलेले अर्थ लिहा.**


(१) हुडहुडी
(२) रुखरूख
(३) फुलोर
(४) अष्टपैलू व्यक्तिमत्त्व
(५) विश्वस्त
(६) सोहळा

**(आ) खालील शब्दांचा सहसंबंध लावा. (रंगछटा आणि नामे)**




**(इ) खालील प्रत्येक शब्दासाठी कुंडीत फुललेल्या शब्दांतून दोन-दोन विरुद्धार्थी शब्द शोधा व लिहा.**

(१) थंड ×
(२) शांत ×
(३) मान ×
(४) स्वदेश ×
(५) आरंभ ×




**(ई) खाली दिलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) कणव निर्माण होणे. | (अ) दया निर्माण होणे. |
| (२) काळजात धस्स होणे. | (आ) उत्साह वाढणे. |
| (३) उत्साह द्विगुणित होणे. | (इ) आकर्षित करणे. |
| (४) भुरळ घालणे. | (ई) भितीने धक्का बसणे. |


**(उ) खालील शब्द अभ्यासा आणि तुमच्या लेखनात त्यांचा वापर करा.**

(१) नखशिखान्त- पायाच्या नखांपासून डोक्यापर्यंत.
(२) आपादमस्तक- पायापासून डोक्यापर्यंत.

**उपक्रम :**

टीव्हीवरील विविध वाहिन्यांवर प्राणिजीवनविषयक प्रसारित होणारे कार्यक्रम तुम्ही पाहता. तुम्हांला आवडणाऱ्या प्राणिजीवनविषयक कार्यक्रमांची यादी तयार करा.

## लिहिते होऊया.




## आपण समजून घेऊया.

- **शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये यांतील फरक.**

खालील दोन गटांतील वाक्ये वाचा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| (१) मी रोज सकाळी सहा**पूर्वी** उठतो. | (१) **पूर्वी** राजेशाही होती. |
| (२) तो आरशा**समोर** उभा होता. | (२) माझा मित्र **समोर** उभा होता. |
| (३) डोंगरा**वर** हिरवेगार गवत उगवले होते. | (३) ताईने **वर** पाहिले. |

वरील दोन्ही गटांत 'पूर्वी, समोर, वर' हे शब्द दिसतात. पहिल्या गटात ते शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती **शब्दयोगी अव्यये** आहेत. दुसऱ्या गटात ते स्वतंत्रपणे आले असून वाक्यांतील क्रियापदांबद्दल विशेष माहिती सांगतात, म्हणून ती **क्रियाविशेषण अव्यये** आहेत.

- **खालील शब्दांचा 'क्रियाविशेषण' व 'शब्दयोगी अव्यये' असा दोन्ही प्रकारे उपयोग करून प्रत्येकी दोन वाक्ये लिहा.**


पुढे, मागे, बाहेर, खाली, जवळ, नंतर.

- **खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा व ती कोणत्या शब्दांशी संबंध जोडतात ते लिहा.**

(अ) मी परीक्षेनंतर पोहण्यास शिकणार आहे.
(आ) तुझ्यादेखील हे लक्षात कसे आले नाही ?
(इ) रस्त्यावरील विजेचे दिवे गेले होते.
(ई) देशाला देण्यासाठी तुमच्याकडे दहा मिनिटे वेळ आहे का ?

**लक्षात ठेवा :** शब्दयोगी अव्यये सामान्यत: नामांना किंवा सर्वनामांना जोडून येतात; पण कधीकधी ती क्रियापदे व क्रियाविशेषणे यांनाही जोडून येतात. उदा., बोलल्यावर, आल्यानंतर, थोडासुद्‌धा, कालपर्यंत, पूर्वीपेक्षा.

# १०. गोमू माहेरला जाते



* ऐका. वाचा. म्हणा.

गोमू माहेरला जाते हो नाखवा ।
तिच्या घोवाला कोकण दाखवा ।।

दावा कोकणची निळी निळी खाडी
दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी
भगवा अबोली फुलांचा ताटवा ।।१।।

कोकणची माणसं साधी भोळी
काळजात त्यांच्या भरली शहाळी
उंची माडांची जवळून मापवा ।।२।।

सोडून दे रे खोड्या साऱ्या
शिडात शीर रे अवखळ वाऱ्या
झणी धरणीला गलबत टेकवा ।।३।।

**ग. दि. माडगूळकर** (१९१९-१९७७) : प्रसिद्ध कवी, लेखक, पटकथालेखक, कादंबरीकार, 'गीतरामायणकार'. 'जोगिया', 'चैत्रबन', 'वैशाखी', 'पूरिया' इत्यादी गीतसंग्रह; 'गीतगोपाल', 'गीतसौभद्र' ही काव्यनिर्मिती; 'कृष्णाची करंगळी', 'तुपाचा नंदादीप' हे कथासंग्रह; 'आकाशाची फळे', 'उभे धागे आडवे धागे' या कादंबऱ्या प्रसिद्ध.

कोकण, कोकणातील खाडी, तेथील निसर्गसौंदर्य, कोकणातील साधी भोळी माणसे यांचे सुरेख वर्णन प्रस्तुत गीतात कवीने केले आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचे कवी | कवितेची भाषा | कवितेचा विषय | कवितेतील पात्र | कवितेत वर्णन केलेल्या गोष्टी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**प्र. २. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) गोमूचे माहेर-

(आ) कोकणची माणसं-

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**

(अ) कोकणची वैशिष्ट्ये

(आ) खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(अ) काळजात त्यांच्या भरली शहाळी →

(आ) झणी धरणीला गलबत टेकवा →

**प्र. ४. कवीने वाऱ्याला केलेल्या विनंतीचा अर्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**



### चर्चा करूया.

- **शहाळ्यातले पाणी आरोग्यदायी असते, याबाबत शिक्षक व पालकांशी चर्चा करा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील शेवट समान असणारे शब्द लिहा.**

(१) नाखवा (३) भोळी

(२) खाडी (४) साऱ्या

**(आ) खालील शब्दांचे तुम्हांला माहीत असणारे अर्थ लिहा.**

(१) शीड (२) माड (३) खाडी (४) शहाळी (५) झणी (६) गलबत



## विचार करा. सांगा.

- तुमच्या घरी आलेल्या पाहुण्यांना तुम्ही तुमच्या गावातील कोणकोणती स्थळे दाखवाल, त्या स्थळांचे थोडक्यात वर्णन करा.

## माहिती मिळवूया.



❖ आपल्या देशातील कोणकोणत्या राज्यांना समुद्रकिनारा लाभला आहे, त्या राज्यांच्या नावांची माहिती आंतरजालावरून मिळवा व नोंद करा.

❖ आपल्या राज्यातील कोणकोणत्या शहरांना, गावांना समुद्रकिनारा लाभला आहे, त्या गावांच्या, शहरांच्या नावांची माहिती आंतरजालावरून मिळवा व नोंद करा.

## आपण समजून घेऊया.

- खालील परिच्छेद वाचा.

नंदा आणि आई मंडईत पोहोचल्या अन् पावसाची रिमझिम सुरू झाली. आई नंदाला म्हणाली, ''तू कांदे, बटाटे व लसूण घे, तोपर्यंत मी भाजीपाला घेते.'' आईने भाजीपाला खरेदी केला, शिवाय फळेही घेतली. नंदाने आईला विचारले, ''आई, लसूण घेऊ की आले घेऊ?'' आई म्हणाली, ''दोन्ही घे; पण लवकर आवर, कारण जोराचा पाऊस सुरू होईल. पाऊस आला, तर आपण भिजू; म्हणून तुला 'घाई कर' असं सांगते आहे.'' नंदा म्हणाली, ''कशाला एवढी चिंता करतेस? आपण रिक्षा किंवा बसने घरी जाऊ, म्हणजे आपण पावसात भिजणार नाही.''

वरील परिच्छेदातील अधोरेखित शब्द दोन वा अधिक शब्दांना किंवा दोन वा अधिक वाक्यांना जोडण्याचे काम करतात, म्हणून या शब्दांना **उभयान्वयी अव्यये** म्हणतात.

'उभय' या शब्दाचा अर्थ **दोन** व 'अन्वय' या शब्दाचा अर्थ **संबंध** असा आहे. दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांचा संबंध जोडणे, हे उभयान्वयी अव्ययाचे कार्य आहे. आणि, शिवाय, की, पण, अथवा, अन्, परंतु, नि हे सर्व शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत.

- खालील उभयान्वयी अव्ययांचा वाक्यांत उपयोग करा.

की, म्हणून, पण, परंतु, अथवा, म्हणजे

- खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.

(अ) सशाची आणि कासवाची पळण्याची शर्यत लागली.
(आ) आईने काटकसर केली; पण शिल्लक काही उरले नाही.
(इ) ती कलिंगड किंवा खरबूज आणणार आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना उभयान्वयी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

## भाषेचा नमुना

# कुपारी बोली (कोकणी)

गावात झुजूकाका घारा पेपर यासॉ. तॉपान दोपारसॉ बारा वाजता. झुजूने पेपर उगडलॉ आन पेपरराशी काळ्या अक्षरात लिवीलेली हेडलाईन जोराय वाशीली. ‘वसईच्या पश्चिम किनारपट्टीवर स्कायलॅब पडणार.’ आत्ये या स्कायलॅबला पड्यादो वसयसॉ किनारॉ बरॉ दिखलॉ. पेपराशा या बातमीन्ये जकल्या गावाशे जकले घाभरे घुभरे झाले. स्कायलॅब पड्यासा आन आपून जकले मरॅशे. मग का? आत्ये रेल्यात तोड्ये दि धमाल करॉन घ्याऑ या कल्पनेने जकले मज्या करण्या कामाला लागले. लोकांना आजूबाजूला बग्यादो वेळूस नॉतो. जही जही १४ तारीख जवळ येतोती तही तही जकल्याई अवस्था घनी बिकट हॉत गेली. बबनशी गत पान तहीस होती. भाटात केळीऑ अंगाठो जरी मोडलो तरी त्याला वाट्यासा स्कायलॅब पडले हायदे आ? एकदासा चौदा जानेवारीओ दी उजाडलो. जॉहो उजाडलॉ तॉहो, तो मावळलॉ पान. पान स्कायलॅब पडताना कुनालास दिखला नाय; पान अजून रात बाकी होती. कहेबहे जिवणे आटपॉन लोक खाट्येऑर पडलॉता पान निज भगून कुना डॉळ्यात येत नॉती. रात आस्ते आस्ते पुड्ये सरकातोती. घड्याळाये काट्ये कय दिखात नॉते, पान त्याई टिकटीक जोराय आयकॉ येतोती. आन एकदम भॉठो आवाज जालॉ. बायारशा खांबोरसॉ दिऑ विजलॉ. लाईट गेली. काळॉकिट. बबनने हळूहळू डॉळे उगडले. समोर त्याला त्याई बय बारझाड करताना दिखली. समोर बय दिखलेऑर त्याला बरा वाटला. त्याने बयला हाक मारली. ‘बलो, स्कायलॅब आपल्यास घरोर पडला गा का?’ ‘रातसा कईस पडला नाय, पान पात्येराती शिशा झाड पडला.’

बरोबर साडेबारा टोल्याला पेपरवालॉ काका आलॉ. त्याने टाकीलॅलो पेपर झुजूने टुक्याशा अगोदर बबनने टुकीलॉ, आन पेपरातशी हेडलाईन जकल्याना आयको जायदे ऑड्या जोरात वाशीली. ‘काल सकाळी दहा वाजून १० मिनिटांनी स्कायलॅब अरबी समुद्रात कोसळले.’ क्षणभर जकला शांत जाला, आन जमलेल्या जकल्यांने एकदम जल्लोश केलॉ.

**सिरील मिनेझीस** (१९६५) : मराठी तसेच कुपारी (कोकणी) बोलीतील साहित्यासाठी प्रसिद्ध लेखक. ‘धरायला गेलो एक’, ‘आभास’ इत्यादी मराठी एकांकिका; ‘मिंगॅरऽ ऽऽ’ हा कुपारी कथासंग्रह प्रसिद्ध.

‘बबन’ या कुपारी बोलीतील कथासंग्रहातून वरील उतारा घेतला आहे.

### शोध घेऊया.



- **कोकणी बोलीभाषेत साहित्यलेखन करणाऱ्या विविध लेखक व कवींची माहिती मिळवा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कुपारी (कोकणी) बोलीभाषेतील वरील उतारा योग्य उच्चारांसह वाचून दाखवावा. उताऱ्यातील शब्दांचे अर्थ व भाषेचे वेगळेपण समजावून सांगावे.